
# संपादकीय






**गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा।**
**पापं तापं च दैन्यं च हरेत् श्रीगुरुदर्शनम्॥**

**श्री** गंगामाता आपल्या पावन जलाने मानवाचे पाप नष्ट करते, चंद्र ताप हरण करतो, तर कल्पतरु दैन्य दूर करतो; पण श्री गुरुंचा महिमा एवढा अगाध आहे की, श्री गुरुंच्या केवळ दर्शनाने पाप - ताप व दैन्य तिन्हीचा नाश होतो. साईभक्त हेमाडपंत श्री साईसच्चरितात म्हणतात -

**फळली जयाची पुण्ये अगाधें।**
**तयांसीच साईदर्शन लाधे।**
**त्रिविधताप तया न बाधे।**
**साधन साधे परमार्था॥**

आपले पूर्वजन्मीचे काही पुण्य म्हणूनच आपणास साईबाबा सद्गुरु म्हणून लाभलेले आहेत, अशी धन्यतेची - कृतार्थतेची भक्तिभावना अनेक साईभक्तांच्या तोंडून होते आणि ते अगदी खरे आहे. गुरु - सद्गुरु हे शोधून प्रयत्नाने मिळत नसतात. प्रयत्नाने भोगवस्तू मिळतात. गुरुसारखा दिव्यतत्त्वबोध हा योगानेच लाभतो. या योगालाच पूर्वसुकृत म्हणतात. ''**बहुत सुकृताची जोडी। म्हणूनि विठ्ठली आवडी।** असे संत

तुकोबाराय म्हणतात ते याच अर्थाने. गुरुभेटीच्या संदर्भात संत ज्ञानदेव म्हणतात "**गुरु अपैसा भेटे।**" म्हणजे वेळ आली की गुरु आपोआप भेटतो, शोधून सापडत नाही. संतांची ही वचने, प्रचीतीचे - अनुभवाचे बोल आहेत, केवळ कल्पना नव्हे. हे बोल परमार्थाच्या महामार्गावरील प्रत्येक साधक आनंदयात्रीस पथदर्शक आहेत. दीपस्तंभ आहेत.

श्री साईबाबांचे आगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ना आपला शिष्यपरिवार निर्माण केला, ना गादी-उत्तराधिकारी तयार केले. आज अनेक महाराजांच्या मठांतील अनाचार व गादीसाठी चाललेली हिंसक साठमारी पाहता बाबांचे वेगळेपण एकदम मनात ठसते. संत गाडगे महाराज यांनीही "माझा कोणी शिष्य नाही, गादी नाही", असे जगाला अंतिम रामराम करण्यापूर्वी जागोजागी कीर्तनांतून सांगितले होते. या अशा विरक्तांनाच खरे संत म्हणावे. अन्यथा आजचे महाराज - महंत आपल्या हयातीतच आपल्या पुढील पिढ्यांना गादी व संपत्ती कशी लाभेल यासाठी लटपटी करताना दिसतात. "संतांचे ते आप्त न होती संत", असे तुकाराम महाराजांनी अत्यंत परखडपणे सांगून ठेवले आहे. पण तुकारामांचा जयघोष करणारेच त्यांच्या या उपदेशाकडे स्वार्थाने दुर्लक्ष करताहेत, असे विदारक सत्य चित्र दिसते.

गुरु, सद्गुरु, जगद्गुरु अशी स्वत:ची वृत्तपत्रांतून - टीव्हीवरून जाहिरात करणाऱ्या संत - महाराजांचा (?) हा काळ आहे. मला गुरु करा - मी कसा श्रेष्ठ गुरु आहे, अशी जाहिरात करणाऱ्यांच्या या काळात, गुरु - सद्गुरुंचा गल्लीपासून दिल्लीपर्यंत झालेला सुळसुळाट पाहता साईबाबांचे वेगळेपण एकदम उठून दिसते. असा सद्गुरु की ज्याने कोणासही शिष्य केले नाही, पण लाखो भक्त त्यांना आपले सद्गुरु मानतात. साईबाबांच्या भक्तांना अन्य बाजारु गुरुची गरज नाही. आपली आई एक, आपला पिता एक, तद्वतच आपले सद्गुरु एक आणि ते म्हणजे साईबाबा ! हा साईभक्तांचा अतूट विश्वास आहे. या विश्वासाचे दर्शन म्हणजे शिरडी येथे संपन्न होणारा साईबाबांचा गुरुपौर्णिमा उत्सव होय !

**सद्गुरु सारखा असता पाठिराखा।**
**इतरांचा लेखा कोण करी ॥**



**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक,
साईलीला

# गुरुगीता - गुरुकृपाप्राप्तीचे सुलभ साधन



**श्री** भगवान व्यास महर्षींनी स्कंद पुराणाच्या उत्तरखंडामध्ये 'गुरुगीता' समाविष्ट केलेली आहे. कैलास पर्वतावर स्वयं शंकर भगवानांनी देवी पार्वतीला ही गुरुगीता सांगितली असून पुढे नैमिषारण्यात सूतजींनी ऋषीमुनींना हाच 'गुरुगीता' उपदेश केला आहे. अशाप्रकारे 'गुरुगीता'चे महत्त्व अत्यंत प्राचीन व अगाध आहे. आपल्या गुरुच्या कृपादृष्टीप्राप्तीसाठी, दर्शनासाठी गुरुगीतेचा पाठ हे एक अत्यंत सुलभ असे दिव्य साधन आहे. गुरुगीता ही मंत्रवत आहे. साधारणतः गुरुवारी या गुरुगीतेच्या पाठाचा 'श्रीगणेशा' करण्याची रीत आहे. हा पाठ करताना आपल्यासमोर आपल्या गुरुची प्रतिमा ठेवतात आणि आपले सद्गुरु आपला पाठ ऐकत आहेत या श्रद्धाभावाने - निष्ठेने पाठ केले जातात.

**विनियोग :**

**ॐ अस्य श्री गुरुगीता स्तोत्र मंत्रस्य भगवान सदाशिव ऋषिः। नानाविधानि छंदांसि। श्री सद्गुरुदेव परमात्मा देवता। हं बीजं। सः शक्तिः। क्रों कीलकं। श्री सद्गुरुदेव कृपाप्राप्यर्थे जपे विनियोगः॥**

**ध्यान :**

**योग पूर्णं वेदमूर्तिं तपोनिष्ठं तेजस्विनम्।**
**गौरवर्णं प्रेममूर्तिं माता भगवती सहशोभितम्॥**
**कारुण्यामृत सागरं शिष्यभक्तादि सेवितम्।**
**ध्यायेद् सद्गुरुं तं श्रीरामम् आचार्यवरम्॥**

तळहातामध्ये पाणी घेऊन गुरुगीतेतील वरील **'विनियोग'** म्हणून पाणी सोडून गुरुगीता पाठाचा संकल्प करतात. या विनियोग मंत्रात ''या गुरुगीतेचा द्रष्टा भगवान शंकर आहेत. यात अनेक छंद आहेत. याचे इष्टदेवता गुरु आहेत. या महामंत्राचे बीज **'हं'** व शक्ति **'सः'** आहे जे माता भगवतीचे प्रतीक आहे. या पाठाचे फल सद्गुरुची कृपाप्राप्ती आहे'', असें म्हटलेले आहे.

विनियोगानंतर, म्हणजे संकल्पानंतर ध्यानमंत्र म्हटला जातो. या ध्यानमंत्राचा अर्थ असा - सद्गुरु हे वेदमूर्ति, तपोनिष्ठ तेजस्वी योगी असून गौरवर्ण प्रेममूर्ती भगवतीसह शोभून दिसतात. ते करूणासागर आहेत. अनेक शिष्य व भक्त त्यांच्या सेवेत आहेत. अशा सद्गुरुंचे व आचार्यवर श्री रामाचे ध्यान मी करतो.

ध्यानमंत्रानंतर जिज्ञासा म्हणून एक श्लोक म्हटला जातो आणि त्यानंतर गुरुगीता सुरू होते. तो जिज्ञासा मंत्र असा -

**गुह्यात् गुह्यतरा विद्या गुरुगीता विशेषतः।**
**ब्रूहि नः सूत कृपया श्रृणुमस्त्वत्प्रसादतः॥**

या श्लोकाद्वारे ऋषीमुनी, महर्षी सूत यांना गुरुगीता व तिचा गुह्यात गुह्य विद्या असा महिमा सांगण्याविषयी आपली जिज्ञासा प्रकट करतात आणि ऋषीमुनीजनांची ही जिज्ञासा - विनंती - प्रार्थना ऐकून महर्षी सूतजी मोठ्या हर्षाने गुरुगीता सांगण्यास प्रारंभ करतात.

**सूत उवाच :**

**कैलाश शिखरे रम्ये भक्ति सन्धान नायकम्।**
**प्रणम्य पार्वती भक्त्या शंकरं पर्यपृच्छत॥१॥**

**श्री देव्युवाचः**

**ॐ नमो देवदेवेश परात्पर जगद्गुरो।**
**सदाशिव महादेव गुरुदीक्षा प्रदेहि मे॥२॥**
**केन मार्गेण भोः स्वामिन् देही ब्रह्ममयोभवेत्।**
**त्वं कृपां कुरू मे स्वामिन नमामि चरणौ तव॥३॥**

(पुढील श्लोक जिज्ञासू वाचकांनी 'गुरुगीता' आणून मूळातून वाचावेत. नियतकालिकाच्या मर्यादित जागेत संपूर्ण 'गुरुगीता' छापणे शक्य नाही. या छोट्या लेखाद्वारे आपले लक्ष मूळ 'गुरुगीता' ग्रंथाकडे वेधणे, हाच आमचा उद्देश आहे.)

□□□

# नवविधा भक्तीचे माहात्म्य





श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
र्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।।

भक्त शिरोमणी बाल प्रल्हाद याने श्रीमद् भागवतामध्ये भक्तीचे हे उपरोक्त नऊ प्रकार सांगितलेले आहेत. १) श्रवण २) कीर्तन ३) स्मरण ४) पादसेवन ५) अर्चन ६) वंदन ७) दास्यत्व ८) सख्यत्व आणि ९) आत्मनिवेदन या नऊ प्रकारांनी भक्ती व्यक्त होते.

नारद भक्तिसूत्रामध्ये भक्तीचे ११ प्रकार कथन केलेले आहेत. भक्ताची स्थिती, गती, अवस्था यांनुसार या प्रकारांपैकी एक वा अनेक प्रकारांनी भगवतप्राप्तीची साधना सिद्धीस जाते. राजा परिक्षित श्रवण भक्तीने, शुकाचार्यजी कीर्तन भक्तीने, भक्त प्रल्हाद स्मरण भक्तीने, देवी लक्ष्मी पादसेवन भक्तीने, राजा पृथू पूजन भक्तीने, अक्रूर वंदन भक्तीने, मारुतीराय दास्य भक्तीने, अर्जुन सख्य भक्तीने, राजा बली आत्मनिवेदन भक्तीने तरल्याची उदाहरणे आपल्या प्राचीन वाङ्मयात आहेत. नवविधा भक्तीचे भगवतप्राप्तीमध्ये साधन म्हणून असलेले महत्त्व यावरून आपल्या लक्षात येते. वरील प्रत्येक भक्ताची कथा म्हणजे भक्तीच्या प्रत्येक प्रकाराचीच कथा आहे.

श्री साईबाबांची भक्ती आज कलियुगातील एक तारक शक्ती ठरली आहे. साईबाबांची भक्ती करून हजारो साईभक्त हा भवसागर तरून गेल्याच्या अनेक लीला सर्वश्रुत आहेत. बाबांच्या अवतारसमाप्तीनंतरही असंख्य भक्तांनी त्यांच्या अनुभवांची प्रचीती घेतलेली आहे. श्री साईबाबांच्या अवतारकाळात त्यांच्या अवतीभोवती निष्ठावान भक्तांचा गराडाच होता. त्या साईभक्तांची थोर साईभक्ती आपणा सर्व साईभक्तांना आदर्श व अनुकरणीय आहे. नवविधा भक्तीच्या दृष्टिकोनातून आपण त्या साईभक्तांकडे पाहिले, तर आपणास असे दिसेल -

**१) श्रवण भक्ती : दादासाहेब खापर्डे**

**२) कीर्तन भक्ती : हेमाडपंत,**
**दासगणू महाराज**

**३) स्मरण भक्ती : मेघा**

४) पादसेवन भक्ती : भागोजी शिंदे, अण्णा चिंचणीकर

५) अर्चन भक्ती : बापूसाहेब जोग

६) वंदन भक्ती : म्हाळसापती

७) दास्य भक्ती : बुट्टी, दीक्षित, लक्ष्मीबाई शिंदे, सौ. तर्खड

८) सख्य भक्ती : शामा देशपांडे, तात्या कोते

९) आत्मनिवेदन भक्ती : बायजाबाई

हे साईभक्तांचे नवविधा भक्तीमध्ये वर्गीकरण अगदी ढोबळपणे आहे. असे इतरही अनेक भक्त आहेत. केवळ मर्यादेस्तव त्यांची नावे इथे दिलेली नाहीत. खरं तर साईभक्तांच्या दृष्टीने

''साई सकळांचे जीवन।

साई सकळांचा जीव प्राण।'' अशीच स्थिती असते.

उपरोक्त साईभक्तांचे विशेषत्व लक्षात घेता असे दिसते की, जगप्रसिद्ध वकील असलेले, फर्डे वक्ते असलेले दादासाहेब खापर्डे बाबांपुढे मात्र एकही शब्द बोलत नव्हते. केवळ बाबा सांगतील ते ते ऐकत. हेमाडपंत यांनी साईसच्चरितं व दासगणूंनी अनेक पदे, अध्याय लिहून बाबांच्या महतीचे गुणकीर्तन अक्षर वाङ्मयरूपात केलेले आहे. मेघा हा एका पायावर उभा राहून जप करीत असे. स्मरण भक्तीचा तो एक आदर्शच आहे. पादसेवा करणाऱ्या अण्णा चिंचणीकरांची मिश्किल कथा श्री साईसच्चरितात आहे. बापूसाहेब जोग हे नित्यनेमाने बाबांची पूजाअर्चा करीत. म्हाळसापती बाबांना वंदन करूनच आपल्या दिवसाची सुरुवात करीत. बुट्टी - दीक्षित यांनी शिरडीत भक्तांसाठी वाडे बांधून बाबांची दास्य भक्ती केली आहे. तसेच लक्ष्मीबाई शिंदे यांची दास्य भक्ती निश्चितच अनुकरणीय आहे. कृष्णार्जुनाचे सख्य आपणास बाबा व शामा यांच्यामध्ये दिसून येते. अर्जुनाला कृष्ण गीता सांगून त्याचा संभ्रम दूर करतो व श्रेयाचा मार्ग दाखवितो. शामास साईबाबा विष्णुसहस्रनामाची पोथी देऊन परमार्थाचा महामार्ग दाखवितात. बायजाबाई कोते या बाबांशी अगदी मोकळेपणी सर्वकाही बोलत. बाबा ते शांतपणे ऐकून घेत. बायजाबाई म्हणजे आत्मनिवेदन भक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे, असे मला वाटते.

बाबांच्या अवतार-समाप्तीच्या वेळी बाबा लक्ष्मीबाईंना प्रथम पाच व नंतर चार अशी ९ नाणी देतात, हे नवविधा भक्तीचेच प्रतिपादन होय !

एकदा पाच एकदा चार।
रुपये खिशातूनि काढूनि बाहेर।
ठेवीत तियेचे हातावर।
तीच की अखेर बाबांची ।।११९।।
की ही नवविधा भक्तीची खूण।
किंवा नवरात्र - अंबिकापूजन।
झाले आज आहे शिलंगण।
सीमोल्लंघन - दक्षिणा ही ।।१२०।। (४२)

- विद्युल्लता

❑❑❑

परी भगत म्हाळसापती।
दादा लक्ष्मी यांची भक्ती।
पाहूनि तयांस रात्रीच्याही वक्तीं।
मनाई नव्हती बाबांची। ९३/४२ अ.

हीच लक्ष्मी अतिप्रीतीं।
प्रत्यहीं पाठवी बाबांप्रती।
भाजी भाकर वेळेवरती।
सेवा ही किती वानावी।। ९४/४२ अ.

हेमाड तयाचे चरणीं निरत।
रेखाटीत कीं तच्चरित ।।२/४३ अ.

## सगुण चरित्रे पावन पवित्रे । सादर वर्णावी संतचरित्रे ।

# वादळवाऱ्यातील दीपस्तंभ

विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक, साईलीला)

**जगाच्या कल्याणा संतांच्या विभुति ।
देह कष्टविती उपकारे ।।**

लोकाभिमुख, समाजसन्मुख संतांच्या लोकमंगल कार्याचे वरील अभंगवर्णन सर्वश्रुत आहे. **''बुडती हे जन न देखवे डोळा ।''** हे संतांच्या कार्याचे अधिष्ठान आहे. धर्मरक्षण आणि धर्माचरण यासाठी कर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि भक्तिनिष्ठांचे जनजागरण ही संतकार्याची संकल्प-साधना व सिद्धी आहे. संतचरित्रातील अनुकरणीय आशय, संतकार्याच्या सामाजिक फलश्रुतीमध्ये दडलेला आहे. थोर विचारवंत कै. गं. बा. सरदार यांनी अत्यंत साक्षेपाने संतकार्याची सामाजिक फलश्रुती ग्रंथरूपाने अधोरेखित केलेली आहे. न्या. रानडे यांनी 'मराठा सत्तेचा उदय' (Rise of Maratha Power) ग्रंथात संतकार्याची सामाजिक कामगिरी नेमकेपणाने प्रतिपादन केलेली आहे. काळ बदलला - परिस्थिती बदलली तरी आजच्या काळातही संतचरित्रे दीपस्तंभाप्रमाणे श्रेयाचा महामार्ग प्रशस्त करतात.

संतचरित्रे ही वृक्षाप्रमाणे आहेत. वृक्षाच्या सावलीबरोबरच त्याची मुळे, खोड, साली, फांद्या, पाने फुले, फळे आणि बिया सारेकाही प्राणीमात्राच्या उपयोगासाठी येते. तद्वतच संतांची अवघी जीवने आदर्श व अनुकरणीय आहेत. म्हणूनच **''सगुण चरित्रे पावन पवित्रे । सादर वर्णावी ।''** असे म्हटले जाते. संतचरित्रांचे गायन - कीर्तन म्हणजे सद्गुणांचे जनजागरण आहे. **''चंदनाचे हात, पायही चंदन । पाहाता अवगुण मिळेचिना ।''** असे संतांच्या चरित्रांचे गुणवर्णन तुकाराम महाराज यांनी केलेले आहे.

संतचरित्रांमध्ये आपणास अनुकरणीय असे अनेक पैलू आढळतात. त्यांची दयाबुद्धी, त्यांची ईश्वरनिष्ठा, त्यांचा साधेपणा, त्यांचा निग्रह, सुखदु:खे समान मानण्याची त्यांची दृष्टी, मानापमानातील त्यांची वृत्ती या साऱ्याच गोष्टी आपणास आजही अनुकरणीय आहेत. तुकाराम महाराज म्हणतात -

**अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।
तैसे संत जगी । क्रिया करूनि दाविती अंगी ।।**

संत केवळ कोरडा उपदेश करीत नाहीत. तर प्रथम कृती करतात. कृतीशील आदर्श आपणापुढे ठेवतात. म्हणूनच **''बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।''** म्हणत अवघा समाज संतवंदन करताना आपण पाहातो.

संतांच्या कार्याचा सर्वात प्रमुख बोध म्हणजे त्यांनी केलेले धर्मरक्षण - त्यांची जाज्वल्य धर्मनिष्ठा ! म्हणूनच संतांचे वर्णन करताना **''जयाचेनि बोले धर्मु जिये ।''** अशा वचनांनी केले जाते. **''संत धर्माचे धर्मक्षेत्र''** असे गौरविले जाते. प्रत्यक्षात संतांचे कार्यक्षेत्र एखाद्या पंथ वा संप्रदायाशी संबंधित असले तरी त्यांची दृष्टी पंथ व संप्रदायापुरती संकुचित नाही. अवघ्या प्राणीमात्राच्या कल्याणाची व्यापकता तिला लाभलेली आहे. म्हणूनच संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या समाप्तीला लिहिलेले - मागितलेले 'पसायदान' हे 'विश्वगीत' म्हणून मान्यता पावते. ज्ञानदेवांच्या या दिव्य - मंगल मागण्यामध्ये केवळ वारकऱ्यांचे - केवळ विठ्ठलभक्तांचे - केवळ मराठी मुलुखवासीयांचे कल्याण चिंतिलेले नाही तर हे मागणे विश्वकल्याणासाठी आहे. ज्ञानदेवांची विश्वात्मक दृष्टी पसायदानाच्या शब्दाशब्दातून व्यक्त होते. **''विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।''** हे मागणे ते विश्वात्मक देवाकडे मागतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ज्ञानदेवांचे एकूण साहित्य त्यांच्या विश्वात्मक व्यापक दृष्टीचेच शब्ददर्शन आहे.

## स्वधर्मे निधनं श्रेयः

श्रीकृष्णाने महाभारत युद्धसमयी अर्जुनास कर्तव्यबोध करून देण्यासाठी सांगितलेला उपदेश, महर्षी वेदव्यासांनी 'श्रीमद् भगवद् गीता'रूपाने आपणा सर्वांना उपलब्ध करून दिलेला आहे. हा गीताउपदेशच संतांनी आपल्या अभंगांतून प्राकृत भाषेत कालसापेक्ष जाणिवांसह व्यक्त केलेला आहे.

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।** (गीता ३/३५)

अशा श्लोकाद्वारे गीतेने स्वधर्माचे माहात्म्य कथन केले असून ज्ञानदेवादी संतमंडळींनी आपल्या कृतीने व शब्दाने अभंगकीर्तनाद्वारा धर्माचरणावर भर दिलेला आहे. संत ज्ञानदेव म्हणतात -

**तैसा स्वधर्मु जरी लोपला।**
**तरी सर्वसुखाचा थारा मोडला।**
**जैसा दीपासवे हरपला।**
**प्रकाशु जाय।।** (ज्ञा. ३/११०)

किती सहजपणे दीप व प्रकाशाचा दृष्टांत - उदाहरण देऊन ज्ञानदेव स्वधर्माचरणाचे महत्त्व प्रतिपादन करतात. धर्म लोपला तर सर्व सुखाचाच लोप होईल, असे ज्ञानदेव का सांगतात, तर त्या काळचे सर्व जीवन हे धर्माधिष्ठित होते. सर्व कर्मांच्या योग्यायोग्यतेची कसोटी धर्म असे. एखाद्याने पैसा कसा कमवावा व खर्च करावा, हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात -

**म्हणोनि स्वधर्मे अर्जे।**
**ते स्वधर्मेचि विनियोगिजे।**
**मग उरे ते भोगिजे। संतोषेसी।।**

पुढे हाच विचार संत तुकाराम महाराज सांगताना म्हणतात -

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे।**
**उदास विचारे वेच करी।।**

स्वधर्माचरण हा संतचरित्रातील मुख्य अनुकरणीय आशय आहे.

## संत तेथ विवेक

आजच्या काळात 'पैसा' हाच अनेकांचे ध्येय आहे. पैसा कमविण्यासाठी वाट्टेल ते मार्ग अवलंबिले जातात. विविध मार्गाने येणाऱ्या पैशांनी आपण श्रीमंत होतो. पण पैसा हे सुखाचे साधन आहे, सुख नव्हे, हेच मुख्य तत्त्व आपण विसरतो. आपणाकडे खूप पैसा असतो पण आपण सुखी असतोच असे नाही. पैशांनी आपण उपभोगांची अनेक साधने खरेदी करू शकतो. पण त्या साधनांद्वारे आपण सुखी होतो का ? साधनांची संपन्नता म्हणजे सुख नव्हे, हे मग जाणवू लागते. पैशांनी आपण अगदी डनलॉपची गादी आणू शकतो, पण गाढ झोप लागण्याचे काय ? गाढ झोप मात्र पैसा देऊ शकत नाही. त्यासाठी मनःशांती - समाधान असावे लागते. बहुतेक अतिश्रीमंतांना झोपेसाठी एक तर गोळ्या घ्याव्या लागतात किंवा मद्याच्या नशेचा आधार घ्यावा लागतो. ज्या पैशाचे - संपत्तीचे आपण सुख घेऊ शकत नाही अशा संपत्तीसाठी रात्रीचा दिवस करीत धडपडायचे का ? हा संपत्तीचा हव्यास, लोभ, मोह अनाठायी आहे, हे आपणास संतचरित्रातील बोधाने समजते. संत आपणास 'विवेक' शिकवितात. विवेकाधिष्ठित विचारातून ज्या कृती जन्म पावतात त्याच माणसास सात्विक सुखाची सावली देतात. कै. गदिमांनी 'जगाच्या पाठीवर' चित्रपटातील एका गीतात एका सुंदर ओळीत म्हटले आहे की - ''उपभोगांच्या शतकमळांची कंठी घातली माला''. आज अनेकांच्या कंठी विज्ञानाच्या हजारो साधनांनी उपभोगांच्या माळाच माळा घातलेल्या आहेत. चैन आणि विलास हाच नव्या युगाचा मंत्र झाला आहे. पण खरेच हा नवसमाज सुखी आहे का ? नाही. का ? कारण एकच; विवेक विचाराचा अभाव. हा विवेकविचार संतचरित्रातून - साहित्यातून आपणास लाभतो. कारण ''संत म्हणजेच विवेक'' असे संत ज्ञानदेव म्हणतात.

**चंद्र तेथ चंद्रिका। शंभू तेथ अंबिका।**
**संत तेथ विवेका। असणेच की।।** (१८/१६३२)

## कर्माचे डोळे ज्ञान

आधुनिक विज्ञान युगातील मानवकल्याणाचे जे काही विचारप्रवाह आहेत ते सर्व बीजरूपाने संतसाहित्यात - संतचरित्रांमध्ये आढळतात. साम्यवाद - समाजवादाची 'समता' संतसाहित्यात ठायी ठायी दिसून येते. त्या दृष्टीने काही संतउक्ती पाहण्यासारख्या आहेत -

**पै भक्ति एकी मी जाणे।**
**तेथ सान थोर न म्हणे।।**

**म्हणोनि भक्ति गा एथ सरे।**
**जाति अप्रमाण ॥**
**आपणचि विश्व जाहला।**
**तरी भेदभावो सहजचि गेला ॥**

माणसाच्याच नव्हे तर प्राणीमात्राच्या सुखाचाही संतांनी विचार केला आहे. गोदावरीच्या वाळवंटात पाण्यासाठी तडफडणाऱ्या गाढवाला गंगेचे पाणी पाजणारे संत एकनाथ आणि कोरडी भाकरी खाऊ नकोस, तुझे पोट दुखेल म्हणत भाकरी घेऊन पळालेल्या कुत्र्यामागे तुपाची लोटी घेऊन धावणारे संत नामदेव यांची कृतिशील भूतदया निश्चितच अनुकरणीय आहे. आज 'प्रिव्हेन्शन ऑफ क्रूयेलटी टू एनिमल्स ॲक्ट' या कायद्याने प्राणीमात्राविषयी दयाबुद्धी निर्माण केली जात आहे. हीच आपली प्रगती म्हणायची का ? या पार्श्वभूमीवर संतांची भूमिका पहा -

**परिभक्तीचेनि नावे। चतुष्पदादि आघवे।**
**वैकुंठीचिये राणिवे। योग्य केले ॥** (१२/९३)

संतसाहित्यात वैकुंठ हे एक मोक्षस्थान आहे. त्या स्थानासाठी मानवाबरोबरच चतुष्पाद प्राण्यांनाही संतांनी योग्य मानले आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

संतचरित्राकडे - साहित्याकडे पाहण्याची आधुनिक तथाकथित विचारवंतांची - नेत्यांची दृष्टी पूर्वग्रहदूषित आहे. संतांना टाळकुटे व संतसाहित्याला भाकडकथा म्हणण्यात धन्यता मानणाऱ्यांनी प्रत्यक्षात त्या साहित्याचा मुळातून अभ्यासच केलेला नाही. न अभ्यासताच अंधश्रद्धा म्हणून संतसाहित्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना काही सांगणे म्हणजे झोपेचे सोंग करणाऱ्यास उठविण्यासारखे निष्फळ आहे. खरे तर अवघे संतसाहित्य हे अंधश्रद्धा निर्मूलन करून डोळस भक्तीचा प्रचार करणारे नंदादीप आहेत. स्थळ-कालसापेक्ष काही भाग वगळता संतसाहित्य हे शाश्वत आहे. कालातीत आहे. चिरंतन आहे.

**"नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।"** ही संत नामदेवांची अभंगवाणी त्यांच्या ठायीच्या ज्ञाननिष्ठेची द्योतक आहे. नामदेवांच्या घरी धुणीभांडी करणारी दासी जनी नामदेवांच्या शिष्यत्वाने संतपदी विराजमान होते, हा एका स्त्रीचा - तळागाळातील स्त्रीचा व्यक्तिविकास आजच्या आधुनिक स्त्रीवादी विचारवंतांनाही थक्क करणारा आहे. इथे स्त्री-समानतेच्या व मुक्तीच्या केवळ वल्गना - कोरड्या घोषणा नाहीत तर चक्क कृती आहे. या दासी जनीचे सुमारे ५०० अभंग मराठी साहित्यात आहेत. आजच्या आघाडीच्या कवयित्रींच्या नावावरही एवढी विपुल व एवढी आत्मप्रत्ययी कविता सापडणे शक्य नाही. म्हणूनच संत नामदेवांचे कार्य स्त्रीवादीच नव्हे तर सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना अनुकरणीय ठरणारे आहे. पंढरी क्षेत्राला कोणी 'भूवैकुंठ', कोणी 'माहेर', म्हटलेले आहे, पण जनाबाई पंढरीचे वर्णन 'विवेकाची पेठ' म्हणून करते. **"विवेकाची पेठ। उघडी पंढरी वाट।"** या तिच्या अभंगचरणातून जनाबाईची विवेकनिष्ठाच दिसून येते व **"ज्ञानदीप लावू जगी"** म्हणणाऱ्या ज्ञाननिष्ठ संत नामदेवांची ती शिष्या असल्याचे सार्थ वाटते.

नामदेवशिष्या संत जनाबाईप्रमाणेच तुकारामशिष्या संत बहिणाबाईचे चरित्रही आदर्श आहे. मातापित्यांनी अगदी बालपणीच बहिणाचा विवाह एका वृद्धाशी लावून दिला. जीवनाचा बहुतेक काळ तिला वैधव्यातच व्यतीत करावा लागला. तरीही बहिणाबाईचे कार्य त्यांना संतपदी विराजमान करून गेले आहे. भागवत संप्रदायाच्या ज्या भक्तिमंदिराचा-इमारतीचा ज्ञानदेवांना पाया व तुकाराम महाराजांना कळस मानले जाते त्या मंदिराच्या कळसापाशी डौलाने फडकणारी ध्वजा होण्याचे भाग्य बहिणाबाईंना लाभले.

**संतकृपा झाली। इमारत फळा आली ॥१॥**
**ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिले देवालया ॥२॥**
**नामा तयाचा किंकर। तेणे रचिला आवार ॥३॥**
**जनार्दनी एकनाथ। खांब दिला भागवत ॥४॥**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश ॥५॥**
**बहेणी फडकती ध्वजा। निरूपण केले वोजा ॥६॥**

उपरोक्त अभंग पूर्णपणे देण्याचे कारण म्हणजे हा अभंग संत बहिणाबाई यांचाच आहे. स्वतःला वारकरी - भागवत संप्रदायाच्या भक्तिमंदिरावरील ध्वजा म्हणून घेण्यात तिने व्यक्त केलेला आत्मविश्वास व आत्मसन्मान स्त्रियांचे वारकरी भक्तिचळवळीतील स्थान दर्शविणारा आहे. ३३% महिला आरक्षणाच्या आजच्या चर्चाकाळात ही गोष्ट निश्चितच काही ठोस बोध देणारी ठरेल, असे वाटते.

❑❑❑

# वैश्विक साहित्यात संत तुकोबांच्या अभंगांचा समावेश

दरवर्षी देहू आणि आळंदीहून पंढरपूरकडे जाणाऱ्या तुकाराम व ज्ञानेश्वरांच्या पालख्यांचे अनन्यसाधारण महत्त्व राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही वाढत आहे. त्याचाच एक परिणाम म्हणून अमेरिकेतील 'ओरिएंट लाँगमन' या विख्यात प्रकाशन संस्थेने 'क्लासिक्स ऑफ वर्ल्ड लिटरेचर' या आगामी पुस्तकामध्ये तुकारामांच्या निवडक १२ अभंगांचा समावेश केला आहे. जेष्ठ साहित्यिक व कवी दिलीप चित्रे यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्यासह बहिणाबाई यांच्यापर्यंतच्या निवडक अभंगांचा संग्रहही प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

तुकोबांच्या अभंगाला मिळणारा वैश्विक पातळीवरचा प्रतिसाद उदंड आहे. आता इंटरनेटवर तुकोबांवर असलेल्या सात ते आठ संकेतस्थळांवर इंग्रजीसह इटालियन, जर्मन, फ्रेंच व अन्य पाश्चात्य भाषांमध्ये मिळून सुमारे एक हजार लेख वाचण्यास उपलब्ध आहेत. गेली सातशे वर्षे चालत आलेल्या या मराठी संस्कृती व साहित्याशी थेट निगडीत असलेल्या सर्वात मोठ्या वारकरी परंपरेस व मराठी भक्तीकवितेस चांगली प्रतिष्ठा लाभत आहे, असे मत चित्रे यांनी व्यक्त केले.

'क्लासिक्स ऑफ वर्ल्ड लिटरेचर'साठी चित्रे यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या या बारा अभंगांची परवानगी 'ओरिएंट लाँगमन' यांना नुकतीच दिली आहे. चित्रे यांच्या 'सेज तुका' या तुकोबांच्या अभंगांवरील इंग्रजी पुस्तकाचा यापूर्वी जर्मन, स्पॅनिश, पोलिश आणि डच भाषांत अनुवाद झाला आहे. तुकोबा हे नित्झे व कन्फ्यूशियस यांसारख्या जर्मन व चिनी तत्त्ववेत्यांच्या तोडीचे विचारवंत होते, हे सर्वमान्य होऊ लागले आहे. जगाला अभिमानाने सांगावे असे हे आपले सांस्कृतिक धन आहे, असे चित्रे यांनी सांगितले.

गेली १२ वर्षे तुकोबांच्या पालखीबरोबर पंढरीच्या वारीत सहभागी होणाऱ्या चित्रे यांच्या 'ॲन अन्थ्रॉलॉजी ऑफ वारकरी पोएट्री' या आगामी पुस्तकात निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव, चोखामेळा, सावतामाळी, गोरा कुंभार, एकनाथ, तुकोबा आणि त्यांच्या शिष्या बहिणाबाई यांच्या निवडक अभंगांचा समावेश आहे. चित्रे म्हणाले की, पंढरपुरला शिरताना वारीतील पाच लाख वारकऱ्यांचा भक्तीरूप आनंद प्रचंड लाटेसारखा शिगेस पोचलेला असतो. तो अनुभव प्रत्येक मराठी माणसाने घ्यावा असाच आहे. आतापर्यंतच्या प्रत्येक सरकारने अनेक सुधारणा केल्या असल्या तरी अजून खूप करण्यासारखे आहे.

*(म.टा. च्या सौजन्याने)*



अपना तकियाँ छोड़ना नहीं।

# साईबाबा हेच आपले सद्गुरु !

आपण सर्व साईभक्त बाबांची लेकुरे आहोत व बाबा आपले माता-पिता आहेत. 'साईबाबा' या शब्दातच आईबाबा ही दोन्ही नाती सामावली आहेत व म्हणूनच साईबाबा हे आपणा सर्वांना जगातील कोणत्याही गोष्टीपेक्षा सर्वाधिक प्रिय आहेत.

खरा साईभक्त साईंपासून कधीही दूर जाणार नाही, त्याचे मन, त्याची भक्ती, त्याची श्रद्धा साईंपासून कधीही विचलित होणार नाही. ज्याचे चित्त साईंपदी स्थिर झाले आहे त्याला जगातील कोणतीही वस्तू किंवा व्यक्ती प्रिय वाटणार नाही. गुरुप्रेमास पतिव्रतेची उपमा दिली जाते. जसा पतिव्रतेस आपला पती श्रेष्ठ वाटतो तसाच सर्व शिष्य-भक्तांस आपला गुरु श्रेष्ठ वाटला पाहिजे. म्हणूनच, आपला बाप तो आपला बाप, असे साईबाबा सर्वांना सांगत असत.

सर्व साईभक्तांनी बाबांची शिकवणूक तंतोतंत पाळली पाहिजे, त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून सबुरी धरली पाहिजे. 'श्रद्धा व सबुरी' हे दोन शब्द फार मौल्यवान आहेत. तितकेच ते आचरणात आणणे महाकठीण कर्म आहे. बाबांनी आपल्या भक्तांकडे नेमके हेच दोन पैसे मागितले. परंतु, आजकाल खऱ्या अर्थाने हे दोन पैसे आपल्या बाबांना कोण देतो ? बाबा श्रद्धा आणि सबुरी या दोन शब्दांनी आपली परीक्षा नकळत घेत असतात.

जीवनात आपल्यावर अनेक बरे-वाईट प्रसंग येतात. वाईट प्रसंगी आपली बाबांवरील श्रद्धा ढळण्याची शक्यता असते. अशा क्षणी विचलित न होता आपण आपली श्रद्धा अढळ ठेवली पाहिजे.

श्री साईसच्चरितात म्हटलेच आहे :--

**चालूं जातां कथिल्या वाटे।**
**आरंभी आरंभी गोड वाटे॥**
**पुढे ऐसे पसरितील सराटे।**
**कांटेच कांटे चोंहीकडे॥**
**मग त्या निष्ठेस फुटतील फांटे।**
**सहज मनी संशय दाटे॥**
**किंमर्थ साई या आडवाटे।**
**आणी हें वाटे मनाला॥**
**परीं हे ऐसे जेथे वाटे।**
**तेथेंच श्रद्धा धरा नेंटे।**
**कसोटीच ही प्रत्यक्ष संकटे।**
**तेणेच पैठें दृढ श्रद्धा।**
**देऊनियां संकटा तोंड।**
**करिता साईस्मरण अखंड॥**
**होतील सकळ अपाय दुखंड॥**
**शक्ति ही प्रचंड नामाची॥**

म्हणूनच साईभक्तीच्या कसोटीला उतरणे तेवढे सोपे नाही. उगाचच "मी साईभक्त" म्हणवणे उचित नाही. खरा साईभक्त बाबांशिवाय क्षणभरही दूर राहू शकत नाही. बाबांच्या शिकवणुकीप्रमाणे वागणे, हाच तो खरा धर्म समजतो.

## साईभक्तांनी गुरु कुणाला करावे ?

मानवजन्मात सर्वांनाच गुरु मिळणे कठीण आहे. सद्गुरु मिळणे तर त्याहून कठीण आहे. एखाद्याला गुरु मिळालाच तर तो कितपत श्रेष्ठ आहे, हे सांगणे कठीण आहे. तो आपल्या शिष्याला कितपत ज्ञान देईल, हे सांगता येत नाही. तशातच नकली गुरु कोणता व खरा गुरु कोणता, हे ओळखणे तर अशक्यच आहे. मुळातच मनुष्य हा अत्यंत श्रद्धाळू आहे. कुठे-ना-कुठेतरी त्याची श्रद्धा असते. कधी कधी तो अंधश्रद्धेला बळी पडतो. समाजात चांगले लोक थोडेच असतात, हे तो विसरतो आणि दुसऱ्याच्या बहकाव्यात येऊन तो आपली श्रद्धा ठेवतो व सर्वस्व हरवून बसतो. एखादा ढोंगी माणूस स्वतःला श्रेष्ठ समजून अंधश्रद्धाळू लोकांना अक्षरशः नागवतो, अशी अनेक उदाहरणे आपण ऐकली आहेत. कुणी, मीच देवाचा अवतार आहे, असे सांगून शिष्यांना चुकीच्या मार्गाला नेतो, तर कुणी गुरुदक्षिणा, धार्मिक विधी या मार्गांनी शिष्यांकडून भरपूर पैसा जमा करून त्यांची फसवणूक करतो. एकंदरीत काय, गरीब श्रद्धाळू व्यक्तीची जास्त फसवणूक या जगात होत असते. म्हणूनच सर्व साईभक्तांनी अत्यंत जागरूक राहून आपली श्रद्धा श्री सद्गुरु

साईबाबांवरच ठेवली पाहिजे व श्री साईसच्चरित हे सर्व साईभक्तांना गुरुतुल्य वाटले पाहिजे. कारण, श्री साईसच्चरिताचे कर्ता हेमाडपंत असले तरी त्याचे खरे जनक बाबाच आहेत. जेव्हा हेमाडपंत बाबांकडे बाबांचे चरित्र लिहिण्याची आज्ञा मागण्यास गेले तेव्हा प्रथम श्री साईबाबांनी, माझे चरित्र उगाच कशाला लिहितोस ? मी एक फकीर असून माझ्या चरित्राने कुणाचा फायदा होणार, असा प्रश्न हेमाडपंतांस विचारला व अखेर चरित्रलिखाणास आज्ञा देऊन, माझे चरित्र मीच लिहवून घेईन, असे सांगितले व दफ्तर ठेवा, त्याला माझे सहाय्य आहे, असे म्हणाले.

दफ्तर ठेवा, म्हणजेच माझे बोल ध्यानात ठेवून लिहून काढा, असे सांगितले. एवढेच नव्हे तर, जो जो भक्त हे सच्चरित वाचील त्याचा मी अंकित होऊन त्याच्या घरी राबेन, असे वचन दिले. श्री साईसच्चरिताच्या प्रत्येक ओवीमध्ये श्री साईबाबांची शिकवणूक खच्चून भरून राहिली आहे. प्रत्येक ओवीतून बाबांच्या दिव्य शिकवणुकीचे तेज आपले डोळे दिपवून टाकते. म्हणूनच आपण सर्वांनी श्री साईसच्चरिताला जिवंत गुरु मानून, त्याचे पारायण करून मनन आणि निदिध्यासन केले पाहिजे व त्याच शिकवणुकीप्रमाणे वागले पाहिजे. म्हणजे मग कोणत्याही साईभक्ताला दुसरा-तिसरा अन्य गुरु शोधावा लागणार नाही.

## श्री साईबाबाच आपले खरे सद्गुरु आहेत

प्रत्येक माणसाला आपल्या आयुष्यात जिवंत सद्गुरु मिळावा, असे वाटते. साईभक्तांना श्री साईबाबा हेच जिवंत सद्गुरु वाटले पाहिजेत. कारण, श्री साईबाबा म्हणत, मी जरी गतप्राण झालो तरी... मी तुम्हासवे सदैव बोलत राहीन... तुमच्या आनंदात डोलत राहीन... तुमची घोकणी अहर्निश करून तुमच्या मागे सदैव उभा राहीन... जो माझे नामस्मरण करून मला प्रेमाने हाक मारील त्याच्यासाठी मी पर्वत-कड्यांवरून उडी मारून त्याचे रक्षण करीन... मला विमान, गाडी अथवा इतर कोणत्याही साधनांची गरज नाही... प्रेमाने हाक मारताक्षणीच मी कुठेही, सातासमुद्रापलीकडेही प्रगट होईन व माझ्या भक्तांचा सर्व भार वाहीन.

सर्व साईभक्तांना याची प्रचीती आजही येत आहे. साईबाबांबद्दल वाटते की,

**ऐसे काही सूत्र चाळविशी,**
**नकळे कोणा कोठे असशी ।**
**परी परिणामी वाटे मनासी,**
**आहेस की पाठिशी भक्तांच्या ।।**

असा खंबीर सद्गुरु आपल्या पाठिशी असताना आपल्याला दुसरीकडे जाण्याची गरजच नाही. आपण आपल्या साईबाबांवर इतका दृढ विश्वास ठेवला पाहिजे व इतक्या तन्मयतेने आपण त्यांना हाक मारली पाहिजे की, बाबा नक्कीच आपल्यासाठी धावत येतील व आपल्याला योग्य मार्ग दाखवतील.

बरेच लोक आपल्याला जिवंत गुरु पाहिजे म्हणून इतरत्र अनेक व्यक्तींच्या पाठीमागे धावत असतात व आपली गाऱ्हाणी त्यांच्यापुढे मांडत असतात. त्यांनी सांगितलेले तोडगे, उपासना करीत असतात. पण, त्यांचे खरे नाते त्या व्यक्तीशी नसते. कुणीतरी सांगितले, अमुक एक व्यक्ती अधिकारी आहे म्हणून हजारो लोक त्या व्यक्तीमागे जातात, त्या व्यक्तीच्या भजनी लागतात व आपल्या खऱ्या आईला विसरतात. आपली आई आपले जेवढे हित पाहील, जेवढ्या ममतेने आपल्याला जवळ घेईल तेवढा जिव्हाळा दुसऱ्या आईला कसा असेल ?

आपण आपल्या आईकडे हट्ट करून एखादी वस्तू मागितली की, आपली आई वाट्टेल ते करून आपल्याला ती वस्तू आणून देते व आपल्या बाळाचे हित पाहते. आपली आई प्रसंगी आपल्याला चिमटा काढील. त्याने हात दुखेलही. परंतु, तितक्याच प्रेमाने ती पुन्हा आपल्याला जवळ घेईल. अशीच माया बाबा आपल्या भक्तांवर करतात.

जीवनात आपल्यावर अनेक जीवघेणे प्रसंग येतात. प्रसंगी आपले मन कुतर्कांच्या नादी लागते व मनात वाईट विचारांचे काहूर माजते आणि मनुष्य भरकटत जाऊन कोणत्यातरी वाईट मार्गाचा, वाईट व्यसनाचा अवलंब करतो. जी व्यक्ती त्याला सल्ला देईल त्याच्या नादी तो लागतो, पुढचा-मागचा विचार न करता आपल्या खऱ्या गुरुपासून दूर जातो व त्रिशंकुसारखी आपली अवस्था करून घेतो.

## श्री साईबाबांची सेवा कशी करावी ?

साईबाबांच्या भक्तांनी सर्वप्रथम पूर्ण विचार करून बाबांची प्रतिष्ठापना आपल्या हृदयात करावी. बाबांची शिकवणूक पूर्ण कळण्यासाठी श्री साईसच्चरिताचे पठण अनेक वेळा करावे. म्हणजे मग ती पूर्ण शिकवणूक आपल्या अंगवळणी पडेल. बाबांचा जप मनामध्ये अखंड करावा. दृढ श्रद्धा ठेवून सर्व कर्तव्ये सबुरीने, म्हणजेच धीराने करावीत. अशा माणसाच्या पाठी बाबा नकळत उभे राहून त्याला योग्य

मार्ग दाखवतात. प्रसंगी अशी रचना करतात की, कुणाही व्यक्तीच्या रूपाने समोर येऊन आपल्याला मदत करतात, मार्ग दाखवतात. मात्र आपण जेव्हा त्या वाईट परिस्थितीतून बाहेर पडतो तेव्हा त्याचे सर्व श्रेय आपण आपल्या स्वतःकडेच घेतो व गर्वाने प्रौढी मिरवतो. तसे न करता आपण जीवनाचे सारे श्रेय बाबांना दिले पाहिजे व साईंमुळेच सारे प्राप्त झाले, असे समजलो तर, आजचे अपयश उद्याच्या यशाची पायरी ठरेल. आपण आपल्या बाबांना सर्वाधिक शक्तिमान मानले पाहिजे. तरच त्यांची शक्ती आपल्याला दिसेल.

आपण आपल्या कर्तव्यापासून जराही विचलित होऊ नये. श्री साईसच्चरितात म्हटल्याप्रमाणे :–

**दुनिया झालिया इकडची तिकडे,**
**आपण न व्हावे मागेपुढे।**
**ठाईच निश्चल राहूनि रोकडे,**
**कौतुक तेवढे पहावे ।।**

आपल्या बाबांची खरी प्रचीती आपण साईचरणी स्थिर झाल्यावर आपल्याला दिसल्याशिवाय राहणार नाही.

आपला सद्गुरु आपल्याला कितीही प्रिय असला तरी दुसऱ्या गुरुचा अगर दुसऱ्या कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीचा अगर देवतेचा आपण कधीही अनादर करू नये. दुसऱ्याच्या उपासनेला तुच्छ मानू नये. बाबांनी सांगितल्याप्रमाणे प्राणीमात्रांस, पशुपक्षांस त्रास देऊ नये. दीन-दुबळ्यांचा अगर दारी आलेल्या भिकाऱ्याचाही अनादर करू नये. कुणाशी भांडू नये. कुणाच्या अंगावर ओरडू नये. असे वागले तरच आपले सद्गुरु साईबाबा आपल्याला संकटी तारतील व तीच त्यांची खरी भक्ती ठरेल.

बाबांना कोणतीही गोष्ट नियमाने केली म्हणजे आवडते. नियमाने भजन, पूजन, वाचन जरूर करावे; पण त्यांना हार, फुले, पेढे इत्यादी प्रिय नसून दोन हात व एक माथ्याने केलेली प्रार्थना आवडते, हे लक्षात ठेवावे. निष्काम, निःस्वार्थी भक्ती बाबांना अधिक आवडते.

आपण आपल्या बाबांना दिवसाच्या कोणत्याही प्रहरी आळवावे. उपास-तापास न केले तरी त्यांची आठवण सदैव ठेवावी. त्यांची उपासना करावी.

आपण कोणत्या तन्मयतेने बाबांना आठवावे ते श्री साईसच्चरिताच्या खालील ओवीत सांगून ठेवले आहे.

**कृपण वावरो कुणाही गावा,**
**चित्तासमोर पुरलेला ठेवा।**
**जैसा तयासी अहर्निश दिसावा,**
**तैसा वसावा साई मनी ।।**

म्हणजेच, साईबाबा हेच आपले सर्वस्व आहेत, असे मानून त्यांच्या चिंतनात रहावे. त्यांचे अखंड नाम घ्यावे. श्री साईबाबा सदैव आपले रक्षण करतील.

बाबांनी म्हटलेच आहे :–

**जया माझिये नामाची घोकणी,**
**झालीच तयाचे पापांची धुणी।**
**तो मज गुणियाहूनि गुणी,**
**जया गुणगुणी मन्नामी ।।**

श्री साईबाबांना त्यांच्या भक्तांनी कुठेही दुसरीकडे गेलेले आवडत नाही.

**नादा कुणाच्या लागू नका**
**जन्मपत्रिका पाहू नका।**

असे ते सर्व भक्तांना नित्य सांगत असत. आपण आपल्या बाबांना 'ब्रह्मांडनायक' असे म्हणतो. ब्रह्मांडामध्ये असलेले गुरु, शुक्र, शनि, राहू, केतू बाबांच्याच अधिपत्याखाली वागत असतात. तेव्हा, ग्रहांची वक्रदृष्टी झाली तरी बाबांची कृपादृष्टी असलेल्या साईभक्तांना भ्यायचे कारणच नाही.

बाबा म्हणत की, सबंध भरजरी शेला मी तुम्हाला देण्यास तयार असताना तुम्ही चिंध्यांच्या नादी का लागता ? म्हणून, सद्गुरु श्री साईबाबाच आपले जिवंत सद्गुरु आहेत. चराचरात त्यांचे अस्तित्व भरून राहिले आहे. त्यांना हाक मारताच ते धावून येतात. ते सर्व देव-देवतांच्या ठाई, सर्व भूतमात्रांच्या ठाई आहेत.

त्यांनी कित्येकांना रामरूपाने, कृष्णरूपाने व ज्याच्या त्याच्या गुरुच्या रूपाने दर्शन दिले आहे. कुणाची भाकर कुत्रा होऊन खाल्ली आहे, तर कुणाच्या दारी जाऊन भिक्षा स्वीकारली आहे.

अशा सर्वव्यापी साईबाबांचा जो भक्त असतो त्याला कधीही इतस्ततः भटकावे लागत नाही व म्हणूनच श्री साईबाबा आपल्या सर्व भक्तांना **''अपना तकियाँ छोड़ना नहीं''** असा प्रेमाचा व कळकळीचा संदेश देतात.

**– मनोहर घ. पितळे**
पितळेवाडी, हनुमान रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

# ॥ साई उवाच ॥

अध्याय ४१वा

संग्राहक : कै. प्र. का. सोमण
(निवृत्त ले. कर्नल)

(मागील अंकावरून पुढे)

पार्श्वभूमी :

डहाणूचे मामलेदार बाळासाहेब देव हे साईबाबांचे निष्ठावान भक्त होते. त्यांना पारमार्थिक व आध्यात्मिक पुस्तके वाचण्याची खूपच आवड होती. पण ज्ञानेश्वरीबाबत त्यांचा अनुभव निराशाजनक होता. काही केले तरी ज्ञानेश्वरीच्या पाच ओव्याही नियमाने त्यांच्याकडून वाचल्या जात नसत. त्यावर उपाय शोधून काढण्यासाठी देवांनी निरनिराळ्या साईभक्तांना विचारणा केली. त्यांनी बापूसाहेब जोग, बालकराम इत्यादी भक्तांना उपाय विचारला व शेवटी निर्णय घेतला की, जोपर्यंत बाबा स्वतःहून ज्ञानेश्वरी "वाच" म्हणून सांगत नाहीत, तोपर्यंत ज्ञानेश्वरी वाचण्याचा प्रयत्नच आपण करायचा नाही.

त्या दिवशी बाबांनी दोनदा दक्षिणा देवांकडून मागून घेतली व नंतर भक्तांची फारच गर्दी मशिदीत झाली म्हणून देव थोडे बाजूला जाऊन बसले. देव समोर दिसले नाहीत म्हणून बाबांनी विचारले,

**कोठें रे सांगड । जागेंत अवघड तो दडला ॥९७॥**

देवांनी उत्तर दिले, "मी येथेच आहे". बाबांनी दक्षिणेबाबत देवांना विचारले, तेव्हा देव म्हणाले, "मी वीस रुपये दिले." बाबांनी विचारले, "पैसे कोणाचे !" उत्तर, "बाबा, आपुले." मग बाबा म्हणाले, "**कां मग सुटले पळत तुम्ही ॥९९॥ यावें ऐसें जवळ यावें । स्वस्थ चित्तें निकट बैसावें।** बाबांनी, "**रुपये आण पंचवीस**" ही देवांना आज्ञा केली. देवांनी ती पुरी केली. बाबांनी त्यांना मशिदीत वर बोलावले. देव तेथे गेले. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "**तुवां माझिये चिंधीसी। चोरियेलेंसी मज न कळतां ॥१११॥ येथेंच कोठें तरी पाहीं।**" ते पुढे म्हणाले, "**तूं शोधीं खोटी ही बुद्धि चोरीची। कवण्या कारट्यानें ती नेली। नघ पाहिजे येथेंच असली।**" (मग बाबा देवांवर कडाडले व म्हणाले :-)

"**तूंच लबाड होसी। तुजवीण कोण ये समयासी। येईल चिंधी चोरावयासी। चोर मीं तुजसीच समजतों ॥११६॥ ऐसा येथें जो येतोस। तो काय चोऱ्या करावयास। झाले काळ्याचे पांढरे केस। खोड न लवलेश कीं जाई ॥११७॥ तुला कुऱ्हाडीनें हाणीन। तुला कापीन, ठार करीन। जाशील कोठें माझिया हातून। येईन मारीन तेथें तुज ॥११८॥ घरून येतोस जो शिरडीस। तो काय चोऱ्या करावयास। घे हे आपुले वापस। आणून चिंधीस दे माझ्या ॥११९॥**

(देव मात्र मनाने अगदी शांत होते. त्यांना वाटले, हे बाबांचे विश्वरूप-दर्शन किती गोमटे आहे. पण, या चिंधीचे काय कोडे होते ते मात्र देवांना मुळीच कळले नाही. मग बाबांनी देवांना, "जा निघून जा" म्हटले, तेव्हा देव बाजूला सरकले. अर्धा तास मध्ये गेल्यावर, बाबांसमोर देव आले, तेव्हा बाबा म्हणाले, "**आलास कां वर, "जा हो चालता वाडियांत.**" त्याप्रमाणे देव साठेवाड्यात परतले. मग बाबांनी भक्तांना जवळ बोलावले. देवही बाबांसमोर इतरांमध्ये जाऊन बसले. मग बाबा म्हणू लागले, "**चिंधीची ती कथा काय। तरी म्या दुरुक्तीं केलें घाय। होतीच चोरिली त्या काय उपाय। बोलल्याशिवाय रहावेना ॥१३१॥ असो अल्ला सारें बघील। तोही तयाचें बरें करील। तंव ए भाऊ दक्षिणा देसील**". **पुसती (देवांना) क्षमाशील श्री साई ॥१३२॥** (पुन्हा बाबांनी देवांजवळ मागणी केली; पण नंतर स्वतःच म्हणाले :-) "**राहूं दे मज नको**" "**सकाळी त्वां दोनदां दिधले। स्मरण न राहिलें मज त्याचें**" **॥१३४॥** (तरीपण देवांनी पैसे जमवून बाबांना दिले तेव्हा बाबा म्हणाले :-) "**काय रे तूं करीत असती**"। "कांहीं नाहीं" देव म्हणाले. (तेव्हा बाबा देवांना म्हणाले :-) "**पोथी वाचीत जा नेमेंसीं।...**



वाडियामाजी जाऊनि बसावें। नित्यनेमें वाचीत जावें। वाचितांना सांगतही असावें। निरूपण भावें सकळिकां ॥१३७॥ सबंध भरजरी सुंदर शेला। बसलों असतां तुज द्यावयाला। जासी कां चिंध्या चोरावयाला। सवई कां तुजला चोरीची'' ॥१३८॥ (याप्रमाणे बाबांकडून देवांना ज्ञानेश्वरी वाचण्याची आशीर्वादासह आज्ञा मिळाली. मात्र, बाबांची आशीर्वाद देण्याची तऱ्हा आपणाला एकदम कळायची नाही.)

चिंधी ते काय ध्यानांत आलें। बालकरामास होतें जें पुसिलें। त्याच चिंध्या तेंच न रुचलें। साईंस, जैं भरले रागानें ॥१४५॥ वाटेल त्या प्रश्नाचें उत्तर। स्वयें द्यावया असतां तत्पर। किमर्थ चौकशा कराव्या परस्पर। म्हणोनि मज दुर्धर छळियेलें (शिकविले) ॥१४७॥ बाबा एकदा देवांच्या स्वप्नात जाऊन त्यांना म्हणाले, ''पोथी पढतां। फारचि आपण घाई करितां। वाचा पाहूं ती मजदेखतां। निकट बैसतां मजपाशीं'' ॥१६४॥ साईमाउलीवीण अशी प्रत्यक्ष साक्ष कोण पटवील !

॥ अध्याय ४१वा समाप्त ॥

## आता उद्धरलो गुरुकृपे ।

श्री गुरुसारखा असता पाठीराखा ।
इतराचा लेखा कोण करी ॥ १ ॥

राजयाची कांता काय भीक मागे ।
मनाचिया जोगे सिद्धी पावे ॥ २ ॥

कल्पतरूतळवटी जो कोणी बैसला ।
काय उणे त्याला सांगा जो जी ॥ ३ ॥

ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो ।
आता उद्धरलो गुरुकृपे ॥ ४ ॥

## गुरुमहिमा

कहे गोरख मछेंद्रनाथ सुत जोगसिद्धि के सार ।
गुरुमुख से जो नर जानत सोहि तरे भव पार ॥

- संत गोरक्षनाथ

गोरख सुत गहिनी कहे नाथ पंथ की बानी ।
ग्यानी जानत गुरुपुत होत सोहि चढे निरबानी ॥

- संत गहिनीनाथ

## गुरुपरंपरा

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ।
मत्स्येंद्र तयाचा मुख्य शिष्य ॥ १ ॥

मत्स्येंद्राने बोध गोरक्षासी दिला ।
गोरक्ष बोळला गहिनीप्रती ॥ २ ॥

गहिनीप्रसादे निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवा सार योजविले ॥ ३ ॥

# अमृत कलश

(साईलीलाच्या जुन्या अंकांतील साईबाबांचे अनुभव) संग्राहक : सुभाष जगताप

## दत्ताच्या देवळाची कथा

शिर्डीपासून १६ कोसांवर संगमनेरजवळ जोखे म्हणून एक गांव आहे. तेथें १९१२ सालीं दत्ताची स्थापना झाली. आजमितीस तें देऊळ म्हणजे गांवचें एक भूषण आहे. त्या प्रसंगीं बाबांच्या लीलेचा जो अनुभव आला त्याची हकीगत श्री. राजाराम रामजी कोते पाटील, शिर्डी व श्री. सगुण मेरु नाईक यांनीं नुकतीच मजजवळ सांगितली ती अशी :–

जोखे गांवकऱ्यांची अशी इच्छा होती कीं आपल्या गांवीं दत्ताचें एक सुंदर देऊळ असावें; म्हणून गांवकऱ्यांनीं देऊळ बांधण्यासाठीं वर्गणी गोळा करण्यास सुरवात केली. बरेच महिने झाले परंतु अपेक्षित वर्गणी जमली नाहीं, व हें देऊळ कधीं काळीं आपल्या हातून बांधून होईल कीं काय याबद्दल गांवकऱ्यांनाच चिंता वाटूं लागली. तेव्हां कोणी तरी सुचविलें कीं, शिर्डीस साईबाबांकडे जा म्हणजे हें देऊळ बांधण्यासाठीं ते पैसे देतील. त्याप्रमाणें कांहीं प्रमुख गांवकरी मंडळी शिर्डीस आली व त्यांनीं बाबांना सर्व हकीगत सांगितली. त्या प्रसंगीं श्री. राजाराम कोते पाटील तेथेंच जवळ उभे होते. आतां बाबा काय सांगतात याकडे सर्वांचें उत्सुकतेनें लक्ष होतें; कारण या लोकांनीं बाबांजवळ आर्थिक मदत मागितली होती. तेव्हां बाबा आतां कांहीं मदत देतात का शिव्या देऊन बोळवण करतात याबद्दल ज्याला त्याला चिंता होती. इतक्यांत बाबा हंसत म्हणाले, 'अरे, चिंता कशाला करतां ? तुम्हीं आपल्या गांवीं परत जा. दोन महिन्यांत तुमच्या गांवीं एक धनिक येऊन तो सुंदर दत्ताचें देऊळ बांधील. जा'. एवढें बोलल्यावर बाबांच्यापुढें आणखी कांहीं बोलण्याची सोयच नव्हती. सर्व गांवकरी उठले. त्यांच्या तोंडावर निराशा पसरली. कारण बाबांच्या बोलण्यावर त्यांचा झटकन् विश्वास बसला नाहीं. ते आर्थिक मदत मिळविण्याच्या हेतूनें आले, पण प्रत्यक्षांत त्यांना हात हलवीत परत जावें लागलें. त्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें.

परंतु खरोखरच दोन महिन्यांत त्या गांवीं शींवचे तात्याजी ऊर्फ काशिनाथ नवरे या नांवाचे एक धनिक गृहस्थ आले. आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार (श्री. नवरे ह्यांचे वडिलांनीं मरते समयीं कांहीं ठराविक रक्कम बाजूस काढून ठेवली होती व तींतून देवळें बांधावीत असें त्यांनीं आपल्या मुलास सांगून ठेवलें होतें) ते प्रवरेच्या कांठाकांठानें देवळें बांधींत चालले व जोखे या गांवींहि देऊळ बांधण्याची त्यांनीं गोष्ट काढतांच गांवकऱ्यांच्या आश्चर्यास पारावार राहिला नाहीं. त्यांनीं मोठ्या आनंदानें श्री. नवरे यांच्याशीं सहकार्य केलें. आतां त्या गांवीं एक सुंदर दत्ताचें देऊळ बांधलें गेले आहे व तें त्या गांवचे एक भूषणच आहे.

अशा रीतीनें तेथील गांवकऱ्यांना बाबांच्या लीलेचा प्रत्यय आला व त्याचें त्यांना अजूनहि मोठें कौतुक वाटत आहे.

## प्रार्थनेचा आवेग

श्री. सदाशिव गजानन जयवंत (दत्तात्रय-निवास, बी ब्लॉक, खोली नं. ३१, तिसरा माळा, पोर्तुगीज चर्चजवळ, दादर, मुंबई नं. २८) यांचा अनुभव :–

१९५० च्या ऑगस्टमध्यें माझी पत्नी टायफॉइडनें आजारी होती. डॉक्टरचें औषध चालू होतें. आजारीपणाच्या १३ व्या दिवशीं तिचें दुखणें एकदम विकोपास गेलें. डॉक्टरांनाहि काळजी वाटूं लागली. दुसरे दिवशीं एखाद्या तज्ज्ञ एम्. डी. डॉक्टरला आणावयासच पाहिजे असें ते मला म्हणाले. तेव्हां मीहि फार घाबरलों. मी साईभक्त आहेंच व आपण आतां मनःपूर्वक सर्व भार साईबाबांवरच टाकला तरच माझी पत्नी हातीं लागेल असें मला वाटलें. मीं आमचे डॉक्टरांस म्हटलें कीं उद्यां तज्ज्ञ डॉक्टरास बोलवण्याचे अगोदर पुन्हां एकदां माझ्या पत्नीची प्रकृति तपासा व नंतर वाटल्यास दुसऱ्या डॉक्टरास घेऊन

या. डॉक्टरांना जरा आश्चर्यच वाटलें, पण ते 'बरं, बरं' म्हणत निघून गेले.

डॉक्टर गेल्यावर मी अगदीं सुन्न होऊन गेलों. पत्नीच्या अंथरुणाकडे लक्ष जातांच तिची स्थिती पाहून मला एकदम भडभडून आलें व त्या आवेगांत मी बाबांची मनःपूर्वक प्रार्थना करून मला जें काय त्यांना सांगावयासारखें वाटलें तें मीं सर्व सांगून टाकलें, आणि नंतर स्वस्थ बसलों. रात्रीं तिला शांत झोंप लागली.

दुसरे दिवशीं (म्हणजे आजारीपणाच्या १४व्या दिवशीं) अगदीं पहांटेसच ती घाबरून जागी झाली. मीं विचारतां तिनें मला सांगितलें कीं, तिला एक नुकतेंच स्वप्न पडलें व त्या स्वप्नामुळें ती घाबरली. स्वप्नांत तिला दिसलें कीं तिला एका तिरडीवर उचलून ठेवलें आहे; तेवढ्यांत एक फकिरी वेषांतील बाबांच्या सारखा म्हातारा आला. त्यानें अंगावरून हात फिरवून तिची छाती उघडली व आंतड्या बाहेर काढून धुतल्या व पुन्हां बसविल्या. आणि या एकंदर दृश्यामुळें ती एकदम घाबरून जागी झाली. मला मात्र हें ऐकून फार आनंद झाला व बाबांनीं कृपा करून माझ्या पत्नीचें दुखणें हटविलें असें मला खात्रीपूर्वक वाटलें. मीं माझ्या पत्नीस स्वप्नाचा अर्थ सांगून तिला धीर दिला.

नंतर सकाळीं ९/१० चे सुमारास डॉक्टर आले. त्यांनीं माझ्या पत्नीस तपासलें व ताप पाहतांच तो नॉर्मलवर आलेला दिसला. तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. ते मला म्हणाले कीं, आतां मोठ्या डॉक्टरास आणण्याची अजिबात जरूरी नाहीं.

□□□

# ॐकार व आरती साधना चौथ्या शिबिराचे शिरडीत आयोजन



**श्री** साईबाबा संस्थान, शिरडी आणि श्री साई ज्ञानपीठ, मुंबई या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने **'ओंकार व आरती साधना'** शिबिराचा उपक्रम शिरडीत राबविला जात आहे. सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत तीन सत्रांत हे शिबीर घेतले जाते. शिबिरार्थींच्या चहा, अल्पोपहार, शाकाहारी भोजन आणि निवासाची व्यवस्था आयोजकांतर्फे केली जाते. आजवर अशा प्रकारची ३ शिबिरे यशस्वी झाली असून दिनांक २३ ते २७ सप्टेंबर, २००२ दरम्यान चौथ्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या चौथ्या शिबिरासाठी रु. ८००/- शुल्क असून इच्छुकांनी दिनांक १५ सप्टेंबर, २००२ पर्यंत मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवून आपली नावे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी साईलीलाच्या जुलै-ऑगस्ट,२००१, नोव्हेंबर-डिसेंबर,२००१ व मार्च-एप्रिल,२००२ या अंकांतील शिबिराबाबतचे निवेदन पहावे अथवा खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

**श्री साई ज्ञानपीठ**
२ प्रामाणिक सोसायटी, पी. एम्. रोड (विस्तारित),
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.
दूरध्वनी : ६१७०४६२ व मुंबईतील इतर
दूरध्वनी : ८३७२४३७, ६२४१२६८, ६२५३४२१
ई-मेल : saidnyanpeeth@rediffmail.com


□□□



# साईंच्या सान्निध्यात बायजाबाई

- सौ. मुग्धा दिवाडकर

**'श्री** सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज' हे जगभर मान्यता पावलेले दैवत आहे. या महान अवतारी विभूतीच्या अद्भुत दैवी शक्तीचा आणि प्रचंड अवतारकार्याचा संपूर्ण आढावा घेणे आपल्यासारख्या पामरांना शक्यच होणार नाही. या दैवी अवताराचा मुळापासून शोध घेण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला गेला. त्यांत काही बाबींविषयी अधिक माहिती मिळाली, काही गोष्टींविषयी केवळ अटकळ बांधण्यावरच समाधान मानावे लागले, तर काही गोष्टी अज्ञातच राहिल्या. आजही साईचरित्राचे काही अभ्यासक साईबाबांविषयीच्या संशोधनात मग्न आहेत.



अभ्यासांतीं साधारणपणे असा निष्कर्ष काढता येईल की, साईबाबांचा जन्म शके १७६० (इ. स. १८३८) च्या सुमारास झाला असावा.

साईबाबा इ. स. १८५४ च्या सुमारास शिरडीस प्रथम दृष्टीस पडले ते तेथील निंबवृक्षातळी ! तारुण्यात नुकतेच पदार्पण केलेल्या त्यांच्या गोऱ्या-गोमट्या, उंचपुऱ्या आणि तेजस्वी, देखण्या रूपाने प्रारंभीच काही गावकऱ्यांना आपल्याकडे आकर्षित केले.

### नाना चोपदाराची आई

बाबांना गावात निंबातळी बसलेले प्रथम पाहिले ते नाना व बाळा चोपदार यांच्या आईने. ती एक शिरडीतील वयोवृद्ध महिला होती. इतरांप्रमाणे तिलाही या मुलाबद्दल कुतूहल वाटू लागले. यासंबंधी तिने सांगितलेली व श्री साईसच्चरितात नमूद असलेली ही हकीकत.....

..... सुरुवातीच्या काळात बाबांचे तेज:पुंज रूप पाहून सर्वजण आश्चर्य करीत. रात्र असो, दिवस असो, ऊन असो,



पाऊस असो बाबा नेहमी एकटेच असत आणि अनेकदा निंबवृक्षाखाली उघड्यावर बसलेले दिसत. कोणाशी विशेष बोलत नसत. त्यामुळे हा वैराग्याचा मूर्तिमंत अवतार आहे तरी कोण ? ही बालमूर्ती येथे कोठून आणि कशी आली ? याची माता-पितरे कोण ? याचा ठावठिकाणा काय ? याविषयीचे गूढ माहिती मिळत नसल्याने अधिकाधिक गडद होऊ लागले.....

..... एकदा खंडोबाचे वारे अंगात आलेल्या दोघा-चौघांना गावकऱ्यांनी या पोराबद्दल विचारले. देवाने सांगितले, "कुदळी आणा आणि या ठिकाणी खणा; म्हणजे तुम्हाला या पोराचा ठावठिकाणा सापडेल." देवाने सांगितल्याप्रमाणे निंबातळी खणल्यावर तेथे विटांचा थर आढळला. त्याखाली असलेली जात्याची तळी दूर सारल्यावर खाली भुयारात एका गोमुखी पाटाभोवती एक जपमाळ व त्याभोवती चार बाजूंना चार समया तेवत असलेल्या आढळल्या.....

..... याबाबत गावकऱ्यांनी बाबांना खोदून खोदून विचारल्यावर बाबा विनोदी ढंगात म्हणाले, "हे माझ्या गुरुचे स्थान ! हेच माझे पवित्र वतन आहे. ते आहे तसेच जतन करा ! येथे दर गुरुवारी व शुक्रवारी उद जाळा ! यातच तुमचे कल्याण आहे." याच निंबवृक्षाखाली बाबांनी १२ वर्षे तपश्चर्या केली. कोवळ्या वयात केलेल्या खडतर तपाने वागण्यात आलेली असामान्यता पाहून ही व्यक्ती खरोखरच सामान्य नाही, याची गावकऱ्यांना खात्री पटू लागली.

बाबांची कीर्ती हळूहळू शिरडी, तसेच आजुबाजूच्या गावांतील लोकांपर्यंत जशी पोहचू लागली तशी बाबांच्या दर्शनासाठी शिरडीत रीघ लागू लागली. त्यापूर्वी गावातील साधे-भोळे भाविक शेतकरी, स्त्रिया, मुले, गावातील सोनार, शिंपी, भिल्ल, सुतार ही मंडळीच बाबांचे विशेषकरून भक्त होती.



गणपतराव कोते पाटील



बायजाबाई

शिरडी गावचे पाटील श्रीमंत गणपतराव कोते पाटील, त्यांच्या धर्मपत्नी सौ. बायजाबाई, त्यांचा मुलगा तात्या कोते पाटील, म्हाळसापती सोनार, काशीराम शिंपी, आप्पा जागले, आप्पा भिल्ल, काशीनाथ, दाजी पाटील कोते, गणपतराव पाटील गायके, वामनराव माणकोजी गोंदकर, विठ्ठल गोंदकर, दगडूभाऊ काळू गायके, भागचंद मारवाडी, नंदराम शिवराम मारवाडी, कोंडाजीभाई मुसलमान, बाळाजी बापूजी जगताप, आप्पाजी कोते पाटील (बयाजी कोतेंचे वडील), संताजी भिवसन शेळके पाटील, गबाजी सुतार, बाप्पाजी कुळकर्णी, साळूबाई शेळके इत्यादी बऱ्याच मंडळींना बाबांचे असाधारणत्व हळूहळू पटू लागले. मात्र, गावातील तेली, वाणी, भटभिक्षुक आणि सनातनी कर्मठ अशा काहींचा बाबांना सुरुवातीपासूनच प्रखर विरोध झाला. बाबांच्या वरवर चमत्कारिक दिसणाऱ्या वागणुकीमुळे ते बाबांना 'वेडा फकीर' समजत होते. कालांतराने साक्षात् प्रत्यंतर आल्याने, स्वतःला अनुभव आल्याने या मंडळींना बाबांचे मोठेपण समजत गेले.

बाबांचे देवपण प्रथमदर्शनीच तात्काळ उमगले ते शिरडीतील **पाटील गणपतराव कोते** आणि त्यांच्या धर्मपत्नी **सौ. बायजाबाइ** यांना. हे दांपत्य अत्यंत सहृदयी, सात्विक, परोपकारी व धार्मिक वृत्तीचे होते. गावात आलेल्या सत्पुरुषांना उभयता मान देत, आदराने वागवीत, त्यांच्या पाया पडत, त्यांना हवे-नको ते पाहत.

त्यामुळे कडकडीत वैराग्य अंगी बाणलेल्या, अत्यंत तेजस्वी अशा शिरडीत आलेल्या व गावकऱ्यांच्या कुतूहलाचा विषय बनलेल्या अगदी लोभस पोराला पाहून पाटील दांपत्याच्या अंतःकरणात वात्सल्याचा, मायेचा भाव जागृत होणे साहजिकच होते. या मायेमुळेच बायजाबाईंना त्या पोराची ओढ लागू लागली. त्या काळी बाबांना जोराचा



विरोध होत असतानासुद्धा या उभयतांनी पहिल्याच दर्शनापासून बाबांचे पाय जे धरले ते अगदी अखेरच्या क्षणापर्यंत ! बाबांवर त्यांनी आपल्या पोटच्या पोराप्रमाणे प्रेम केले. ज्यावेळी साईबाबांना वेड्यात काढले जात होते त्यावेळी बायजाबाईंनी त्यांना आपल्या मायेची ऊब दिली.

पाटील जोडपे पहिल्यांदा बाबांच्या दर्शनाला गेले तेव्हा काय झाले, याविषयीचे वर्णन करताना श्री. पां. बा. कवडे 'श्री संतसाईमहाराज यांचे चरित्र' या पुस्तकात लिहितात :-

''सौ. बायजाबाई दर्शनास येताच महाराज तात्काळ उठून उभे राहिले. चुकलेल्या वासराला अचानक आपली माय दिसावी तसे ते सौ. बायजाबाईंकडे आशाळभूतपणे पाहू लागले. जणू पूर्वजन्मीचा संबंध ते या जन्मी निश्चित करीत होते. अशा स्थितीत काही वेळ गेल्यावर महाराजांच्या मुखातून 'मामी' म्हणून सहजोद्‌गार बाहेर पडले. ते अत्यंत जिव्हाळ्याचे उद्‌गार व महाराजांचे बालवय पाहून स्त्री-हृदयातले प्रमुख द्वार जे मातृप्रेम ते बायजाबाईंच्या अंत:करणात सताड उघडले गेले. त्या माउलीच्या वात्सल्यभावना उंचबळल्या. त्यांच्या ठिकाणी वात्सल्यप्रेम दाटू लागले. त्या भेटीच्या क्षणापासून बायजाबाई हयात होत्या तोवर महाराज त्यांच्याकडे माता म्हणून पाहत असत.''

श्री. कवडे पुढे लिहितात :-

''सौ. बायजाबाई या महाराजांस प्रथमच्या भेटीत कोणत्या स्वरूपात दिसल्या हे त्यांचे त्यांनाच माहीत ! कारण वैराग्यरूपी जळती मशाल हातात घेऊन सर्व मनुष्यांकडे समदृष्टीने पाहण्याचे त्यांचे व्रत, ते बायजाबाईंच्या बाबतीत सहज मोडले गेले. बायजाबाईंनी त्या थोर अशा महात्म्यास पुत्रप्रेमाने कायमचे आकर्षित केले.''

श्री. कवडेंच्या मते, ''बाबा शिरडीत येऊन कायमचे रहाण्यास सकृतदर्शनी जी कारणे दिसत होती त्यातील महत्त्वाचे कारण, महाराजांचे बायजाबाईंवरील मातृप्रेम व बायजाबाईंचे महाराजांवरील पुत्रवत प्रेम हे असावे.''

जे काही असो; पण बायजाबाईंना बाबांनी आईच्या ठिकाणी मानले एवढे मात्र खरे ! बाबांच्या इच्छेविरुद्ध त्यांना आग्रह करण्याचे सामर्थ्य कोणाच्यात नव्हते; पण बाबा स्वत: स्वत्व विसरून बायजाबाईंशी बोलत आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अत्यंत लडिवाळपणे देत.

सुरुवातीपासूनच अगदी नित्यनियमाने बायजाबाई बाबांना भाकरी पोचवीत. स्वत: रानावनातून वाट काढीत बाबांना शोधून काढत. भाकरी व कोरड्यास असेल ते स्वत:च्या हाताने घास भरवून जेवू घालीत. त्यांच्या हयातीत व त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या घरचा भाकरतुकडा खाल्याशिवाय बाबांचा एकही दिवस गेला नाही आणि बायजाबाईंनी बाबांना घास भरवल्याशिवाय कधीही अन्नग्रहण केले नाही. त्यांच्यामागून त्यांच्या मुलानेही हे व्रत पुढे तसेच चालू ठेवले.

यासंबंधीचा प्रत्यक्ष पुरावा बायजाबाईंचा मुलगा व बाबांचा लाडका भक्त तात्या कोते पाटील यांनी २५ डिसेंबर, १९१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. त्यात ते म्हणतात :-

''दिवाण बहादूर श्रीसाई आबाद संस्थान, यांचेसमोर मी, तात्या बिन गणपतराव कोते पाटील, रहाणार शिरडी, विचारल्यावरून माहिती देतो की, मी शिरडी येथे रहाणारा असून माझे जन्मापासून माझा सांभाळ श्री समर्थ साईबाबांनीच केला आहे. माझे आईबापही श्री समर्थांच्या नेहमी सेवेत असून समर्थ आमचे घरातील वडील व आमचे कुलदैवत असे समजून आम्ही आजपर्यंत चालत आलेलो आहोत. सुमारे बारा वर्षांपूर्वी श्री समर्थ कोणाकडून दक्षिणा वगैरे कांही घेत नसत. त्यांचा उदरनिर्वाह गावात ठराविक घरी भिक्षा भाकरीची मागून ते करीत असत.

प्रसंगी कांही बाबतीत जरूर लागल्यास मी लहान होतो तोपर्यंत माझे आईबाप पुरवठा करीत असत. मी वयात आल्यापासून वडिलांचे पश्चात् मी करीत आहे. पुढे दिवसेंदिवस श्रींचे तप जसे जसे वाढत गेले तसे तसे त्यांचे भक्तलोक फारच येऊ लागले आणि त्याकरिता ज्या ज्या वेळी आवश्यक लागणारे खर्च, ते मी करीत आलो व हे सर्व खर्च मी समर्थांचा मुलगा आहे असे समजून केले आहेत. पुढे दिवसेंदिवस खर्च वाढत चालला तो आत्तापर्यंत दररोज सुमारे ७५ पासून १२५ पर्यंत वाढला आहे. हा सर्व खर्च श्रींना मिळणारी दक्षिणा व कमीजास्त लागल्यास माझे स्वत:चे इस्टेटीतून, याप्रमाणे भागवीत आहो. मी पूर्वी ज्या स्थितीत होतो ती स्थिति बाबांच्या कृपेने हल्ली १०० पटीहून जास्त सौख्याची झाली असून हे श्रेय श्री समर्थांच्या चरणांचे आहे.''

या निवेदनाच्या शेवटी कै. तात्या पाटील कोते यांची स्वदस्तुरची सही असून साक्ष म्हणून शिरडीतील प्रमुख व साईबाबांच्या नित्य सहवासात असणारे रामचंद्र दादा कोते पाटील, बायजाबाई आप्पाजी कोते, पांडुरंग भिकाजी शेळके, सखाराम महादू कोते पाटील यांच्या स्वदस्तुरच्या सह्या आहेत. शिवाय, याप्रसंगी रा. ब. हरि विनायक साठे, डॉ. पिल्ले, चिंचणीकर वगैरे बाबांच्या प्रतिष्ठित अशा भक्तांनी हजेरी लावली असल्याचा उल्लेख आहे.

पुढे मशिदीत स्थिरावल्यानंतर मात्र बाबा भिक्षेसाठी बाहेर पडत तेव्हा बायजाबाईंकडे कधी कधी दिवसातून ४-५ वेळाही भिक्षेसाठी जात असत; पण बायजाबाईंनी त्यांना कधीही विन्मुख परत पाठविले नाही; उलट बायजाबाई त्यांना घरात येण्याचाही आग्रह करीत. अगदी क्वचित प्रसंगीच बाबा त्यांच्या घरात जात. बायजाबाई बाबांना जेवणाचा आग्रह करीत. त्या वेळेस तात्याबांची पत्नी आणि बायजाबाईंची सून - सौ. रंभाबाई या बाबांना जेवण वाढीत व बाजूला उभ्या राहून त्यांचे बोलणे ऐकत. बायजाबाई व बाबा जवळ बसून गोष्टी बोलत. रंभाबाई यासंदर्भात म्हणतात :-

''त्या उभयतांच्या गोष्टींत इतका जिव्हाळा दिसून येत असे की, जणू मायलेकरेच बोलत आहेत. जेवणापूर्वी बाबा मुद्दाम विचारीत, ''आज तुमच्या घरी मांस-मटण वगैरे केलं आहे काय ?'' कारण आरंभी सुमारे चाळीस वर्षे त्यांनी मांसाहारास स्पर्शही केला नाही. ज्या दिवशी आमच्या घरी मांसाहार नसेल त्याच दिवशी बायजाबाई त्यांना आग्रह करीत. जेवणात भाकरी, पिठले, कांदा, मिरची, चटणी, लोणचे यांचाच ते उपयोग करीत. दुसरा कोणताही पदार्थ बायजाबाईंनी आग्रह केला तरी ते घेत नसत. क्वचित प्रसंगी थोडेसे दूध तेवढे घेत.''

''बाबांच्या पूर्वाश्रमीची माहिती मिळवण्याच्या दृष्टीने बायजाबाईंनी कुतूहलापोटी बाबांना अनेक वेळा प्रश्न विचारले; पण बाबांनी कशाचाही थांगपत्ता कधीच लागू दिला नाही. बायजाबाई बाबांना अत्यंत आग्रहाने म्हणत, ''तुम्ही तुमच्या घरच्या मंडळींना एकदा तरी आणाच; नाहीतर आम्हाला त्यांच्यासंबंधी माहिती द्या; म्हणजे आम्ही त्यांना घेऊन येऊ.'' परंतु, बाबांच्या तोंडून प्रांत, जात, आईबाप अगर परिचित यांच्या नावाचा चुकूनसुद्धा ओझरताही उल्लेख कधी झाला नाही. ''तुम्ही कोठून आलात ?'' या प्रश्नावर त्यांचे ''बहुत बहुत लंबे'' एवढेच उत्तर असे. मी उभयतांचे वरील तऱ्हेचे बोलणे अनेक प्रसंगी ऐकलेले आहे.''

रंभाबाई पुढे म्हणतात :-

''श्री बाबांच्या समाधीनंतरही आमच्या घरातून सांजसकाळ ज्वारीच्या भाकरीचा नैवेद्य जात आहे. कोणताही सणवार असला तरी ज्वारीच्याच भाकरीचा नैवेद्य ! बाबा ती उष्टावल्याशिवाय रहात नसत. बाबा ज्वारीची भाकरीच विशेष खात. सणाच्या दिवशी आमच्या घरी भिक्षेसाठी येत त्यावेळीसुद्धा ज्वारीच्याच भाकरीची भिक्षा घेत.''

अजूनही बाबांना नैवेद्य दाखविल्याशिवाय बायजाबाईंच्या घरातील कोणीही अन्नाचा घास घेत नाहीत.

अंतसमय जवळ आल्यावर बायजाबाईंनी अंथरूण धरले. त्या वेळेस बाबा एक-दोनदा त्यांच्याकडे आले व काही उपदेश केला.

मृत्यूसमयी बायजाबाईंचे वय सुमारे ७५ वर्षांचे होते. त्यांची प्रेतयात्रा नेहमीच्या रस्त्याने स्मशानाकडे जाऊ लागली तेव्हा बाबांनी निरोप पाठवला की, प्रेतयात्रा द्वारकामाईकडून न्यावी. तशी ती द्वारकामाईकडून जाऊ लागली त्यावेळी बाबा द्वारकामाईच्या जोत्यावर उभे राहिले आणि आपल्या धीरगंभीर आवाजात त्यांनी हंबरडा फोडला,

''अरे, माझ्या कोत्याची आई चालली रे..... अरे, माझी मामी गेली रे..... !''

..... या आर्त गगनभेदी स्वराने सारे गावच हादरले असा भास झाला.

बायजाबाईंचे घराणे पिढीजात श्रीमंत होते. त्यामुळे तेरावा दिवस बाबांनी मोठ्या प्रमाणात करण्यास सांगितले व हजारो गोरगरिबांस अन्नदान करविले.

पुढे ३ जानेवारी, १९१२ रोजी बाबांनी त्यांचा एक परम भक्त मेघा याच्याकडून गायत्रीपुरश्चरण पुरे झाल्याच्या निमित्ताने काही ब्राह्मणांना भोजन देवविले. त्याच दिवशी संध्याकाळी बायजाबाईंचे यजमान व तात्या पाटलांचे वडील गणपतराव कोते पाटील हे साईचरणी विलीन झाले.

❑❑❑

ग्रंथ परिचय

# 'मशिदीत प्रगटला परमेश्वर'

## जुन्नरकरांच्या कादंबरीची संक्षिप्तावृत्ती प्रकाशित



**श्री** साईभक्त कै. रघुनाथ जुन्नरकर यांनी लिहिलेली व स्वतःच प्रकाशित केलेली 'मशिदीत प्रगटला परमेश्वर' ही कादंबरी गेली अनेक वर्षे भक्तांना अप्राप्त झाली होती. त्या कादंबरीची संक्षिप्तावृत्ती साईबंधू विजय हजारे यांनी नुकतीच प्रकाशित केली आहे.

कै. रघुनाथ जुन्नरकर हे चित्रपट क्षेत्रातील नामवंत लेखक, पटकथालेखक, संकलक, दिग्दर्शक होते. त्यांनी साईबाबांवर चित्रपट काढण्याच्या इच्छेने जी कथा-पटकथा तयार केली तीच संहिता १९७८ साली 'मशिदीत प्रगटला परमेश्वर' या नावाने कादंबरीरूपात प्रकाशित करण्यात आली होती. पहिल्या आवृत्तीच्या सर्व प्रती हातोहात संपल्या आणि पुढे कादंबरी मिळणे दुरापास्त झाले. लेखक जुन्नरकर यांना धनलक्ष्मीच्या कृपेअभावी, कादंबरीची दुसरी आवृत्ती काढण्याचे मनात असूनही शक्य झाले नाही.

कै. जुन्नरकरांची कादंबरी ही मुळात चित्रपटाची संहिता आहे. त्यामुळे चित्रीकरणाच्या अनेक तपशिलांमुळे ती अकारण पसरट झाली होती. चित्रीकरणाचा हा सारा तपशील वगळून श्री. हजारे यांनी २९८ पानांमध्ये प्रस्तुत कादंबरीची संक्षिप्तावृत्ती प्रकाशित केली आहे. कादंबरीची छपाई, मुखपृष्ठ उत्तम-देखणे आहे.

सोळा वर्षांचे युवा साईबाबा निंबाच्या झाडाखाली ध्यानमग्न बसलेले आहेत. त्यांना पाहून सारा गाव गोळा झालेला आहे. बायजाबाई, तात्या कोते आदि मंडळी त्या लोकांमध्ये आहेत. अशा दृश्याने-प्रसंगाने या कादंबरीचा प्रारंभ होतो. आणि ''लक्ष्मणा, तो बापू जोग समजतो मी मेलोय. तसं नाही रे. मी कायमचा जिवंत राहणार आहे तुमच्यासाठी. आज तो माझी आरती करणार नाही. तू तरी ये आरती करायला'', या बाबांच्या उद्‌गाराने या कादंबरीचा समारोप होतो. एकूण ३७ भागांत ही कादंबरी विभागलेली आहे. कै. जुन्नरकर हे चित्रपटकथालेखक आहेत. आपण साहित्यिक नाही, याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. तसे त्यांनी प्रस्तावनेतही स्पष्ट म्हटलेले आहे. मूळची चित्रपटकथा कादंबरी म्हणून छापल्याने ती कादंबरीच्या नेहमीच्या साच्यात - संकेतात बसत नाही. अर्थात, भक्तिभावाने या साहित्यकृतीचे वाचन करणाऱ्या साईभक्तांना साहित्यबंधाची ही उणीव महत्त्वाची नाही, त्यांना साईबाबांचे अलौकिक चरित्र आणि लीला यांमध्येच रस असणार आहे.


चांद पाटलाकडच्या वऱ्हाडातून बाबा शिरडीला येतात आणि त्यांची खंडोबा मंदिरापुढे म्हाळसापतींशी भेट होते. या प्रसंगात म्हाळसापती ''आओ साईबाबा'' म्हटल्यावर; ''चलो ! आता हू तुझ्या विठोबाच्या मंदिरात'', असा संवाद बाबांच्या तोंडी घातला आहे. या संवादात मंदिर विठोबाचे चुकून झाले आहे ते खंडोबाचे पाहिजे होते. अशा बऱ्याच तपशिलांच्या उणिवा या पुस्तकात आहेत. कादंबरी म्हणून 'पोएटिक जस्टीस' (कलेचा न्याय) या नावाखाली त्या दुर्लक्षही केल्या जातील असे वाटते.

असो. कोणत्याही रूपातील साईनामासाठी अधीर अशा साईभक्तांना ही संक्षिप्तावृत्तीसुद्धा आनंददायक वाटेल, यात शंका नाही.

**- विद्यानंद**

**मशिदीत प्रगटला परमेश्वर**
लेखक : **कै. रघुनाथ जुन्नरकर**
प्रकाशक : 'साईप्रसाद', कांदरपाडा,
दहिसर, मुंबई.
पाने : २९८ मूल्य : रु. १५०/-

# श्रीमनुस्मृति : समाजहितैषी तळमळीचे शब्ददर्शन




'महाभारताचे वास्तव दर्शन' या सडेतोड ग्रंथाचे लेखक म्हणून थोर विचारवंत, भाष्यकार प्राचार्य अनंतराव आठवले अवघ्या मराठी वाचकांना परिचित आहेत. त्यांची विपुल व वैविध्यपूर्ण ग्रंथसंपदा प्रज्ञा-प्रतिभेचे एक अनोखे दर्शन आहे. ज्ञानदेवांसारखी गुरुभक्ती, तुकाराम महाराजांसारखे भक्तिप्रेम आणि संत रामदास स्वामींसारखा सडेतोड-रोखठोकपणा यांचा प्रयाग संगम आपणास प्राचार्य आठवले यांच्या व्यक्तिमत्त्वात व लेखनात दिसून येतो. साईभक्त संतकवि दासगणू यांचे उत्तराधिकारी व रसाळ कीर्तनकार म्हणून प्राचार्य आठवले सर्व साईभक्तांना परिचित आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी संन्यास ग्रहण केला असून ते **'स्वामी वरदानंद भारती'** झाले आहेत. सद्या त्यांचे कायम वास्तव्य हिमालयातील उत्तरकाशी येथील कैलास आश्रम येथे आहे.

स्वामी वरदानंद भारती यांच्या प्रदीर्घ चिंतनाचे नवनीत नुकतेच एका भाष्यग्रंथ रूपात प्रकाशित झाले आहे. या हजार पानांच्या सार्थ व सभाष्य महाग्रंथाचे नाव आहे 'श्रीमनुस्मृति'!

खरं तर भारतामध्ये ऋषी-मुनी यांनी लिहिलेले सुमारे ६५ स्मृतिग्रंथ अभ्यासकांमध्ये प्रसिद्ध आहेत पण 'मनुस्मृति' हा विविध कारणांनी एक वादग्रस्त स्मृतिग्रंथ ठरला आहे. अर्थात त्यामागे अनेक गैरसमज-अपसमज आहेत. ते गैरसमज दूर व्हावेत व मनुस्मृतिचे सार्थ मोठेपण सर्वांच्या लक्षात यावे या उदात्त दृष्टीने स्वामी वरदानंद भारती यांनी 'श्रीमनुस्मृति'चा लेखनप्रपंच केलेला आहे. खरं तर स्वामीजी आज सर्व प्रकारच्या लोकेषणापासून दूर आहेत. तरीपण समाजाला सत्याचे दर्शन घडविण्याच्या तळमळीने त्यांनी हे लेखन केलेले आहे. **'आम्हाला हे माहीतच नव्हते', 'आम्हाला हे कुणी सांगितलेच नाही'** अशी उद्याच्या पिढीला कोणतीही सबब मिळू नये म्हणून स्वामीजींनी 'बुडते हे जन न देखवे डोळा' या संतत्वाच्या भूमिकेतून **'श्रीमनुस्मृति'** भाष्य लिहिलेले आहे. स्वामीजींनी ज्या अनाग्रही पण परखड भूमिकेतून हे लेखन केले आहे, तशाच अनाग्रही - निखळ, प्रांजळ समाजहितैषी दृष्टिकोनातून आपण ते वाचले पाहिजे - समजून घेतले पाहिजे.

कोणताही ग्रंथ जाळून वा त्या कृतीच्या कर्त्याचे पुतळे नष्ट करून एखाद्या त्रिकालाबाधित सत्य गोष्टीला कोणीही संपवू शकत नसतो. मनुस्मृति आज अनेक देशांच्या घटनेचा आधार ठरलेली आहे. वैदिक अभ्यासकांनी वेदविरोधी चार्वाकाचे ग्रंथ जाळले नाहीत उलट त्या मताचा आपल्या दर्शनशास्त्र अभ्यासात समावेश केला, हे उदाहरण लक्षात घेऊन त्याकडे सहिष्णुतेचा आदर्श वस्तुपाठ म्हणून पाहिले पाहिजे - अनुकरण केले पाहिजे. जगात विविध देशांत उपलब्ध असलेल्या समाजव्यवस्थेत मनुस्मृतिप्रणित समाजव्यवस्था कमीतकमी दोष असणारी आहे, अशी स्वामीजींची खात्री आहे.

या महाग्रंथाचे तीन विभाग आहेत. पहिल्या विभागात लेखकाने आपली भूमिका अत्यंत सविस्तर व तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेली आहे. दुसऱ्या भागात मनुस्मृतितील मूळ संस्कृत श्लोक व त्यांचा अनुवाद समाविष्ट आहे आणि तिसरा भाग परिशिष्ट आहे. परिशिष्ट २७० पानांचे आहे. असे प्रदीर्घ परिशिष्ट क्वचितच कोण्या ग्रंथास लाभले असावे.

मनुस्मृतिचा काळ; मनुस्मृतिचा लेखक, मनुस्मृतिचे स्थान, वैशिष्ट्ये अशा अनेक विषयांचा सविस्तर परामर्श घेत स्वामीजींनी आपली भूमिका अत्यंत स्पष्ट व रोखठोक मांडलेली आहे. 'परलोक, पुनर्जन्म मान्य करून मनूने काही कर्मकांडे सांगितलेली असली तरी मनूचा मुख्य भर

ऐहिक जीवनही सात्त्विक व समृद्ध असावे यावर आहे. त्यादृष्टीनेच मनूने वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था लावून दिलेली आहे असे स्वामीजींचे मत आहे. मनूप्रणित वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, न्यायव्यवस्था आणि अर्थकारण याविषयी त्यामागील भूमिकेच्या दृष्टीने काही विचार स्वामीजींनी मांडलेले आहेत.

''' 'मनूवादी' ही आजकाल एकप्रकारची शिवी झालेली आहे. कोणी मान्य करो वा न करो पण मनूची समाजव्यवस्था आजही भारतभर विविध राज्यांत चालू आहे. ती कालबाह्य झालेली नाही'' असे सांगून स्वामीजी म्हणतात - ''समाज संघर्षविरहित असावा, लहानमोठ्या गटाला, व्यक्तीला वा कुटुंबाला सुखीसमाधानाने शांतपणे जगता यावे अशी व्यवस्था मनूच्या व्यवस्थेत आहे. काळाच्या ओघात - पारतंत्र्यामुळे मनूप्रणित व्यवस्थेत काही दोष निर्माण झाले आहेत, हे खरे. पण त्यामुळे मूळ व्यवस्थाच त्याज्य मानणे हे अज्ञानी अहंकाराचेच द्योतक आहे.''

''वर्णव्यवस्थेचा सूक्ष्मपणे विचार न करता सरधोपटपणे मनूने विषमतेचा पुरस्कार केला म्हणून दोष दिला जातो. पण जगाच्या पाठीवर जेवढ्या समाजव्यवस्था आहेत त्यामध्ये कमीअधिक विषमता आहे. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल हे पाश्चात्य तत्त्वज्ञानी विचारवंत विषमतेचे घोर पुरस्कर्ते होते याकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. त्या देशांमध्ये सामान्य नागरिक व दास (गुलाम) असे दोन वर्ग आहेत. त्यांच्याकडील दासांचे (गुलामांचे) जीणे मनूव्यवस्थेतील शूद्रांपेक्षाही खालच्या दर्जाचे आहे. गुलामांच्या शोषणाकडे डोळेझाक करून मनूप्रणित व्यवस्थेतील शूद्रांच्या शोषणावर टीका करतात त्यांनी अलेक्झांडर सम्राटाचा दूत मेगॅस्थेनिस याचे भारताबाबतचे मत पाहावे. मेगॅस्थेनिस म्हणतो - **'हिंदुस्थानात आपणाकडील समाज-व्यवस्थेतील गुलामाप्रमाणे कोणीही गुलाम नाही.'** यावरून भारतीय वर्णव्यवस्थेतील विषमता किती सौम्य होती हेच दिसून येते'' असे स्वामीजी म्हणतात.

धर्माला अफूची गोळी म्हणणाऱ्या मार्क्सच्या साम्यवादाच्या यशापयशाचा आलेख पाहताना स्वामी म्हणतात - ''१९१७ च्या सुमारास लेनिनच्या प्रभावाने रशियात साम्यवादी राजवट उदयास आली. तिने जवळपासचे देश गिळंकृत केले. जगातील एक श्रेष्ठ प्रभुसत्ता म्हणून रशियाचा जन्म झाला आणि अवघ्या ७०-७५ वर्षांत ही प्रभुसत्ता पूर्णपणे कोसळली. रशियाचे तुकडे-तुकडे झाले. साम्यवादविरोधी चळवळीने युरोप घेरला. मार्क्सचे 'कॅपिटल' ग्रंथ जाळले गेले; मार्क्स-लेनिन-स्टॅलिनचे पुतळे उखडून टाकले गेले. साम्यवादातील वरवर सुंदर वाटणारी समतेची कल्पना प्रत्यक्षात आलीच नाही. **'साम्यवादाचा प्रयोग एक शोकांतिका ठरली'** असे निराशाजनक उद्गार गोर्बाचेव्ह व येल्तसिन यांनी काढले. या घटनाचक्रातून आपण कोणता धडा घेणार ? विषमता ही नष्ट होणारी वस्तू नाही हेच यातून सिद्ध होते. मग विषमता अपरिहार्य आहे तर व्यवसायविकेंद्रीकरण करणारी मनूची वर्णव्यवस्था स्वीकारणेच अधिक उपयुक्त ठरते. मार्शल टिटोच्या निधनानंतर **'जगातील सर्वात श्रीमंत साम्यवादी (कम्युनिस्ट) नेता मेला'** असा उल्लेख झाला. त्यानंतर युगोस्लाव्हियाचे ४ तुकडे झाले. साम्यवादाची ही विटंबना सर्व जगाने पाहिली - अनुभवली आहे. अशा साम्यवादाकडून नव्या समाजव्यवस्थेची कितपत आशा करता येणे संयुक्तिक ठरते.

वर्णव्यवस्था ही ब्राह्मणधार्जिणी व ब्राह्मणांना सगळ्यात जास्त सोई देणारी आहे असा बहुतेकांचा गैरसमज आहे. या गैरसमजातूनच मनूस्मृति न वाचता-पाहता तिला केवळ स्वार्थांध वृत्तीने विरोध होत आहे. आज मनुस्मृति प्रमाण मानून एखाद्या सरकारने राज्य करावयाचे ठरविले तर समस्त ब्राह्मण मंडळी त्यास विरोध करेल. मनूने ब्राह्मणाला केवळ कोरडा सन्मान दिला आहे पण धन, वैभव, संपत्तीच्या संग्रहास मनाई केलेली आहे. एका दिवसापेक्षा - महिन्यापेक्षा अधिक लागणारे धन-धान्य संग्रह करणाऱ्या ब्राह्मणास तो कनिष्ठ दर्जाचा समजतो. एकाच गुन्ह्यासाठी शूद्रापेक्षा ब्राह्मण गुन्हेगारास ६४ पट, १०८ पट अधिक शिक्षा फर्मावतो. आज कोणता ब्राह्मण ही धनसंग्रहाची अट व शिक्षेतील विषमता मान्य करेल ? **जातीने ब्राह्मण व कर्माने ब्राह्मण असे दोन वर्ग मनू करतो आणि केवळ कर्माने जो ब्राह्मण आहे त्यास मान देण्यास सांगतो.**

केवळ जातीने ब्राह्मण असलेल्यांना राजाने सर्वसामान्यांप्रमाणे कर व दंड योजना लागू करावी असे मनू सांगतो.

मनूस्मृतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा शुद्ध अनुवंशिकतेवर भर आहे. रेसचे जातीवंत घोडे, दुधाळ गायी, गुन्हा शोधणारी कुत्री, लांब लोकरीच्या मेंढ्या याबाबत आपण शुद्ध वंशाला महत्त्व देतो. जातीवंत म्हणून त्यांची प्रौढी मिरवतो. मग हाच नियम मानवाच्या वंशाला लावणारा मनू विषमतावादी - प्रतिगामी - जातीवादी कसा ठरतो ? असा प्रश्न करून स्वामीजी म्हणतात - अनुवंशाचे शास्त्रीय सत्य पशुबाबत योग्य मानणारे आजचे बुद्धिवादी मानवाबाबत ते मान्य करीत नाहीत हा दांभिकपणाच नव्हे काय ?

स्वामीजींनी विविध विषयांवर आपली सत्यनिष्ठ परखड मते अत्यंत स्पष्टपणे मांडली आहेत. ही त्यांची मते हट्टी, नवमतवादी आणि कट्टर परंपरावादी या दोघांनाही पटणारी नाहीत याची त्यांना जाणीव आहे. तरी त्यांनी कोणाला पटो वा न पटो आपले विचार स्पष्टपणे मांडलेले आहेत. कोणताही हट्ट - दुराग्रह - पूर्वग्रह मनी न ठेवता सामाजिक हित एवढाच उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून वाचकांनी या मतांचा गंभीरपणे विचार करावा अशी स्वामीजींची विनम्र विनंती आहे.

स्वामीजींचा अधिकार - अनुभव आणि विद्याव्यासंग खूप मोठा आहे. त्यांच्या ग्रंथकृतीचे परीक्षण करणे एवढे सोपे नाही. त्यामुळे प्रस्तुत लेखनप्रपंच हे ग्रंथपरीक्षण नसून केवळ ग्रंथपरिचय आहे, हे सूज्ञ वाचकांनी लक्षात घ्यावे व मूळ ग्रंथ वाचण्याचा प्रयत्न करावा.

- विद्यानंद

**श्री मनुस्मृति (सार्थ-सभाष्य)**
पाने १०१० मूल्य रु. ५००/-
**लेखक : स्वामी वरदानंद भारती**
प्रकाशक : राधादामोदर प्रतिष्ठान,
प्रतीक ४०३/१, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०.

## गुरुकृपा

**- संत तुकाराम**

सद्गुरुराये कृपा मज केली ।
परि नाही घडली सेवा काही ।।
सापडली वाट जाता गंगेस्नाना ।
मस्तकी तो जाणा ठेविला कर ।।
भोजना मागती तूप पावशेर ।
पडिला विसर स्वप्नामाजी ।।
काय न कळे उपजला अंतराय ।
म्हणोनि काय त्वरा झाली ।।
राघवचैतन्य केशवचैतन्य ।
सांगितली खूण मालिकेची ।।
बाबाजी चैतन्य सांगितले नाम ।
मंत्र दिला राम कृष्ण हरि ।।
माघ शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार ।
केला अंगीकार तुका म्हणे ।।

## जाणतेने गुरु भजिजे

**- संत ज्ञानेश्वर**

मज हृदयी सद्गुरु ।
जेणे तारिलो हा संसारपूरू ।
म्हणोनि विशेषे अत्यादरू ।
विवेकावरी ।।

जैसे डोळ्या अंजन भेटे ।
ते वेळी दृष्टीसी फाटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे ।
महानिधी ।।

का चिंतामणी आलिया हाती ।
सदा विजयवृत्ति मनोरथी ।
तैसा पूर्णकाम श्रीनिवृत्ती ।
ज्ञानदेव म्हणे ।।


म्हणोनि जाणतेने गुरु भजिजे ।
तेणे कृतकार्य होइजे ।
जैसे मूळसिंचने सहजे ।
शाखापल्लव संतोषती ।।

पुढत पुढती तोचि ।
अभिवंदिला श्रीगुरुची ।
अभिलषित मनोरुची ।
पुरविता तो ।।

❑ ज्ञानेश्वरी गुरुस्तुति

# मानवी जीवनातील गूढ रहस्ये (भाग ३ रा)

सुखसाधनांची रेलचेल होऊनही आजचा मानव सुखी का नाही व तो सुखी कसा होईल याचा उहापोह स्वामी दत्तावधूत यांनी 'मानवी जीवनातील गूढ रहस्ये (भाग ३रा) या पुस्तकातील १४ प्रकरणांत केला आहे.




**(१) मानव सुखी आहे का ?**

सुखसाधनांची रेलचेल असूनही मानव इतका दुःखी का ? मनुष्य जेव्हा सुखी असतो तेव्हा तो ईश्वराला विसरतो. त्यामुळे त्याच्यावर दुःखाचे पर्वत कोसळू लागतात. ईश्वरभक्ती व दान या दोन गोष्टी विसरल्याने आजचा मानव दुःखी झालेला आहे. जीवनातील गूढ रहस्ये शोधण्याचा डोळसपणे प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला आहे.

**(२) अदृश्य शक्ती :**

मानवी जीवन हे अदृश्य सृष्टीकडून नियंत्रित केले जाते. पृथ्वीतलावर जी माणसे ताळतंत्र सोडून वागतात, बेताल वागतात, अशी सर्व माणसे वेताळ लोकातून पृथ्वीतलावर जन्माला आलेली असतात.

वेताळाच्या प्रांतातून सुटका झालेले लोक पुढे भैरवाच्या ऊर्फ क्षेत्रपालाच्या प्रांतात जातात. स्वार्थी लोकांनी केलेला दानधर्म ईश्वरापर्यंत जाऊन पोहचत नाही. स्वामी म्हणतात, जेव्हा अनेक लोक खूप पाप करतात तेव्हा समाजाला शिक्षा करण्यासाठी चोरी, दरोडे, लूटमार, हत्या, युद्ध, भूकंप, आतंकवाद, चक्रीवादळे इत्यादी रूपांनी रुद्रशक्ती कार्य करू लागते. ईश्वरी इच्छेच्या विरुद्ध मनुष्य स्वार्थाने वागतो, कपटाचरण करतो, त्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रारब्धाचा तोल बिघडतो. एका कंजूष माणसाची गोष्ट येथे सांगितली आहे. सत्कर्मे आपल्याला दिव्य व प्रकाशमय शरीरे प्राप्त करून देतात, तर आपलीच दुष्कर्मे व आपल्यातील दुष्प्रवृत्ती, स्वार्थ, लोभ, कंजूषपणा इत्यादी आपल्याला अशुभ, पशूंची शरीरे प्राप्त करून देतात.

**(३) ईश्वर संधी देत असतो :**

मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर प्रेम, परोपकार, ईश्वरभक्ती व दान या चार सद्गुणांच्या आश्रयाने मानवाने स्वतःचा उद्धार करून घ्यावयाचा असतो. हे चार सद्गुण मानवाला ईश्वरापर्यंत नेऊन पोहचविण्यास समर्थ आहेत.

**(४) उच्च लोकातील आत्मे :**

पृथ्वीतलावरील डॉक्टर्स, इंजिनियर्स, शिल्पकार इत्यादी यक्ष-यक्षिणी-लोकांतून जन्माला आलेले असतात. तसेच गंधर्वलोक, अप्सरालोक, जलअप्सरालोक, नागलोक येथून जन्मलेल्या आत्म्याचे वर्णन स्वामींनी येथे केले आहे. मानवदेह हे एक वाहन असून या वाहनात बसून आत्म्याने

परमात्म्याच्या दिशेने प्रवास करावयाचा असतो.

**(५) अदृश्य सृष्टी :**

पृथ्वीतलावर घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांचे मूळ अदृश्य सृष्टीत असते. अशा काही व्यक्तिगत व सामाजिक घटना या प्रकरणात दिल्या आहेत. अदृश्य सृष्टीमध्ये चांगले, वाईट, मध्यम असे तीन प्रकारचे आत्मे असतात. मनुष्य आपल्या कर्मानुसार विशिष्ट प्रकारच्या आत्म्यांच्या आधीन रहात असतो. या चाकोरीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ईश्वरभक्ती, दान व परोपकार. दान व परोपकार करून प्रथम प्रारब्ध शुद्ध करावे लागते. तद्नंतर पुण्याई साठू लागते.

**(५) संचित - प्रारब्ध - क्रियमाण :**

आपण जन्माला येताना असंख्य जन्मांचे कर्म आपल्याबरोबर असते. कर्माच्या या गाठोड्याला संचित म्हणतात. या संचितातून या जन्मी आपण जेवढे भोग भोगणार असतो त्याला प्रारब्ध म्हणतात. मनुष्य या जन्मी जे जे काही कर्म करतो त्या सर्व कर्माला क्रियमाण कर्म असे म्हणतात. हे क्रियमाण कर्म संचितात जमा होत असते. ईश्वराच्या दरबारात मृत्यू ही घटना नसते. आत्मा शरीर सोडून देतो. कर्माप्रमाणे त्याला नवीन शरीर मिळते. चांगल्या-वाईट प्रवृत्तींची फळे भोगावी लागतात याची दोन उदाहरणे स्वामींनी येथे दिली आहेत.

**(७) मानव-जन्म-रहस्य :**

स्वामी दत्तावधूत म्हणतात, माणसाला त्याच्या कर्मानुसार बुद्धी होत असते. घर, पैसा, पाणी, मुले, नातेवाईक या सर्व गोष्टी पूर्वजन्मातील कर्मानुसार किंवा पूर्वजन्मातील ऋणानुसार प्राप्त होत असतात. आपल्या मृत्यूचा दिवसही जन्माला येतानाच ठरलेला असतो व मृत्यू कसा येणार हेही ठरलेले असते. कर्माच्या भट्टीमध्ये तावून-सुलाखून मनुष्याचा आत्मा शुद्ध होत असतो व ईश्वराच्या दिशेने पुढे पुढे जात असतो. तांत्रिक-मांत्रिकापेक्षा ईश्वराचे एखादे स्तोत्र दररोज ३/४ वेळा वाचणारा मनुष्य खूपच श्रेष्ठ असतो. आचार-विचार जसजसे पवित्र होऊ लागतात, तसतसे माणसाला साधुत्व प्राप्त होते. मनुष्य अंतर्बाह्य पवित्र होतो तेव्हा त्याला साधू म्हटले जाते. ईश्वरी कृपा कशी होते याचे येथे वर्णन केले आहे. श्रीफल कल्प-नारळामध्ये दुष्ट स्पंदने खेचून घेण्याची ताकद आहे. येथे श्रीफल कल्पाची माहिती सांगितली आहे व काही उदाहरणे दिली आहेत. एक हजार वेळा परमेश्वराचे नामस्मरण करणे व एक परोपकार करणे या दोन्ही गोष्टी समान आहेत. यासंबंधी दोन कथा येथे सांगितल्या आहेत. गाईमध्ये तेहतीस प्रकारची दिव्य स्पंदने आहेत. म्हणून तिला पवित्र मानतात.

**(८) मानव-देह-रहस्य :**

या भागात हिमालयातील हेडाखानबाब व शिष्य गुमानीचे अनुभव, तसेच सिद्ध नागार्जुन व चिदंबर दीक्षित यांची माहिती दिली आहे. परोपकार हेच पुण्य व परपिडा हेच पाप होय, हे विशद केले आहे.

**(९) मानव - मृत्यू - रहस्य :**

कुंभार समाजाची कुंभारक्रिया वर्णिली आहे.

**(१०) प्रार्थनेचा अभाव :**

ईश्वरभक्ती, प्रेम, परोपकार व माणुसकी या गोष्टी दैवीकृपा प्राप्त करून देतात. स्वामींचे ग्रंथ वाचणाऱ्यांचे काही दिव्य अनुभव येथे वर्णिले आहेत.

**(११) उद्‌बोधक कथा :**

श्रीस्वामी समर्थ व दोन वाद्यांची कथा. स्वामी म्हणतात, मनुष्यजन्माचा दुरुपयोग केला असता पशू, पक्षी इत्यादी योनींत जन्म मिळतो व यातना भोगाव्या लागतात.

**(१२)** काही भाग्यवान योग्यांची येथे उदाहरणे दिली आहेत. श्यामचरण लाहिरी, योगी वेमन्ना, गुहेतील गूढ, कायाकल्प, नागासहित अदृश्य हे प्रसंग वाचताना खरोखरच अत्यंत विस्मय वाटतो.

**(१३) सृष्टीरहस्य :**

दर १८० वर्षांनी पृथ्वीतलावर काही विशेष बदल होतात. इ. स. २००१ पासून पुढील १८० वर्षे कशी जातील ते सांगितले आहे. लघुपरिवर्तनीय युगापासून लघुप्रलय, प्रलय, महाप्रलय, ग्रहप्रलय, ब्रह्मप्रलय व ईश्वरप्रलय यांची कल्पना देऊन स्वामींनी नवदुर्गांची माहिती दिली आहे.

**(१४) ईश्वरप्राप्तीचा मार्ग :**

अध्याय १, जन्म-कर्म यात स्वामींनी ६६ नियम दिले आहेत. अध्याय दोनमध्ये ईश्वरभक्ती म्हणजे काय व ती कशी करावी, हे स्पष्ट केले आहे. ७२ मुद्दे देऊन स्वामी श्री दत्तावधूत म्हणतात, हे सर्व मुद्दे तुम्ही आचरणात आणा; म्हणजे दिव्य परमानंदाची प्राप्ती होईल, जीवन संपूर्ण सुखी होईल.

**- विजया केळकर**

# साई वंदना

## माझ्या सद्‌गुरुचे पाय पुरातन

समाधी माझी संजीवन
गेले साई सांगून
करतील द:खनिवारण
माझ्या सद्‌गुरुचे पाय पुरातन ॥ धृ० ॥

मशीद ही ज्ञानगाभा
पाठी गुरुस्थान शोभा
कडू सारे गोड करीत
आहे नीमवृक्ष उभा
नित्य घाला प्रदक्षिणा
करा सद्‌गुरुचे स्मरण
करतील द:खनिवारण
माझ्या सद्‌गुरुचे पाय पुरातन ॥ १ ॥

धरा चावडीची वाट
न्याय आहे निमिषात
लेंडीबागेतला पाट
कड्यावरूनि भूगर्भात
कष्ट-भोग कुणा नाही
त्यागातच सुंदर जगणं
करतील दु:खनिवारण
माझ्या सद्‌गुरुचे पाय पुरातन ॥ २ ॥

गुरुवीन ज्ञान नाही
ज्ञानावीन गती नाही
प्रकाशले पाणी जेथे
सुख मिळे पणतीलाही
मज पायी जो जो आला
तो तो झाला रे पावन
करतील दु:खनिवारण
माझ्या सद्‌गुरुचे पाय पुरातन ॥ ३ ॥

- संजय के. परळकर
दादर (प.), मुंबई.



## श्रद्धा-सबुरीचे नाणे

श्री साईबाबा म्हणतात,
तुम्ही कणभर द्या मला।
मी मणभर देईन तुम्हाला ॥ १ ॥

तुम्ही दीनदुबळ्यांना करा दान
मी देईन तुम्हाला कुबेराचा मान ॥ २ ॥

तुम्ही भक्ती करा रात्रं-दिन।
मी आहे जवळ हे माझे वचन ॥ ३ ॥

तुम्ही निष्ठा ठेऊनि माझ्यावरती।
मस्तक ठेवा माझ्या समाधीवरी ॥ ४ ॥

दु:ख दारिद्र्य चिंता भय जाती दूर पळूनि।
अश्रू आनंदाचे येती भरूनि नयनी ॥ ५ ॥

माझे जो लिहील-गाईल गाणे।
मी देईन त्यांना श्रद्धा-सबुरीचे नाणे ॥ ६ ॥

- अविनाश पाध्ये
बोरिवली, मुंबई.

## शिरडीच्या वाटेवरी...

शिरडीच्या वाटेवरी, माझं हे मन जातं
बाबांच्या चरणांवरी, लोळण बघा घेतं ॥ धृ. ॥

साजरे बाबा माझे, साजरी द्वारकामाई...
बाबांचे भक्त सारे, हातात उदी घेती...
श्रद्धेच्या मनानं, सबुरीच्या फुलानं
बाबांचे नाम घेत, दर्शनी मन जातं ॥ १ ॥

बाबांसी लागे भूक, लक्ष्मी भाकर देई...
टांगल्या फळीवरी, साई झोप घेई...
बाबांच्या अगाध लीलांचे, भक्त आहेत साक्षी
अनंत लीला बघण्या, माझं हे मन जातं ॥ २ ॥

एकदा शिरडीवरी, मरीची साथ येई...
साई पीठ दळी, अल्लाचे नाम घेई...
द्वारकामाईशी तेव्हा, बायांची दाटी वाढे
बाबांचे कौतुक सारे, भक्तांना भुरळ पाडे
बाबा रागावले बाबा गालात हसले, साऱ्यांना कळले...
गावच्या सीमेवरी दळणाचं पीठ जातं ॥ ३ ॥

बाबांचे भक्त हौशी, सतत सेवेशी
एक भक्त गोपाळ बुटी, 'वाडा' बांधती...
अखेरसमयी, बाबाच सांगती
मला हो न्या, बुटींच्या वाड्याशी
बकुळ फुले, भक्त हो वाहती
अनुसूताचे बोल, भक्तांच्या ध्यानी येती ॥४॥

- दीपक रामचंद्र उदावंत (अनुसूत)

## उठ माउली

उठ माउली, उठ माउली, उठ आता झडकरी
उभे ठाकले भक्तगण ते दर्शन घ्याया द्वारी ॥

सुरू जाहले गीत मधुर ते अहा ! विहंगांचे
चराचराला जाग येऊनि एकेक कण हर्षूनि नाचे
तुझ्या पदाला स्पर्श कराया आतुरले ते सारे अंतरी –

डुलत्या वेली कळ्या लाजऱ्या मंद झुळूक ती सांगे
पहाट झाली रजनी सरली नवेच गुंफा धागे
तुझ्या दर्शना तिष्ठत बसती तुझी बालके खरी –

सुगंध घेऊन नाचत आला पवन लक्षवेधी
नवे ताटवे नटूनि थटूनि दावीत बसती धुंदी
प्रसन्नता ती बघून हर्षती परी उभे दारी –

दे दे दर्शन तुझे हासरे आस एक चित्ती
मुख अवलोकून तृप्त होऊ दे फुलू दे कांती कांती
तुझी चेतना मिळो अलौकिक आस एकली उरी –

- डॉ. माधव पोतदार
बालकृष्ण सोसायटी, धनकवडी,
पुणे.

## साईभक्ती

साई हाक देता देता सागराला ओहोटी यावी
शिळा झाल्या अहिल्येची पाप, शाप, मुक्ती व्हावी... ॥धृ॥
नाम कीर्तनाचे ठायी
प्राण मृदंगाचा केला।
भाव भक्ती गजरात
जीव साईनाथ झाला॥
युगे युगे सामर्थ्याची काय सांगा, महती गावी ॥१॥
आरतीच्या कापुरात
जळे अंतरीची ज्योत।
भक्तांघरी दान घ्याया
उभा दिसे साईनाथ॥
भाकरीच्या भोजनाला नैवेद्याची गोडी यावी ॥२॥
जळे देह नेत्री गात्री
साई संगीताचा संग।
प्राण प्राण आसक्तीचे
पाजळती अंतरंग॥
भक्ती साधनेची तृष्णा भक्तिरसात भिजावी ॥३॥

- बळवंत नायक
नागपूर.

## ।। साई आहे सांग कोठे ।।

साई आहे सांग कोठे कोणी त्याला पाहिला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। ध्रु०।।

तो प्रभाती मजला रवीच्या किरणी जागे करी।
पाखरांच्या किलबिलीची धून छेडी साजरी।।
पारदर्शी जलाशयाचा मज आरसा जणू दाविला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। १।।

स्वागताला अंगणीची फुलवूनिया जाईजुई।
गंध न्यारा वाऱ्यासवे तो नाचवी थुई थुई।।
तो स्पर्श माझ्या आळसाची तोडून देई श्रृंखला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। २।।

साई माझ्या हातून त्याची करवूनिया घेता पूजा।
भक्त आणि परमेश्वराचा भाव मग सरतो दुजा।
मी लावताना दीप साई ज्योत त्याची जाहला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। ३।।

जणू रागदारी साई झाला एकतारी तालासवे।
टाळ मृदंगी ठेक्यावरी अभंग तो गातो नवे।।
तोच त्याच्या कीर्तनी माझ्यासवे नाचला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। ४।।

साई माझा श्वास झाला अंतरीच्या स्पंदनी।
हृदयातूनि त्याच्याच उमटे भक्तीचा प्रतिध्वनी।।
हा देह त्याचा दान, त्याच्या सेवेस आता वाहिला।
तो हमेशा भोवताली नित्य माझ्या राहिला।। ५।।

- कु. प्रिया प्रकाश पोतदार
६-ब, वृंदावन अपार्टमेंट, हरेश्वर नगर,
रिंग रोड, जळगाव.

□□□

## सदा मार्गी साई

नाम तुझे घेताना
कंठ दाटूनि येई
पाझर फुटे अश्रूंना
मन समाधानी होई
कोणी असो अथवा नसो
तू सदैवच आहेस
तोल जाताना माझा
सावरले सदा तू आहेस
नाम तुझे आठवूनि साई
मन माझे धन्य होई
खडतर या जीवनात
मार्ग दाखवणारा एक तूच साई

- सौ. रसिका सुर्वे
तावरे कॉलनी, पुणे.

## साईबाबा

साईबाबा ! साईबाबा !!
आहेस तूचि अमुचा त्राता
पवित्र 'शिरडी'चा तू निर्माता
बाबा, साई, साईनाथा !
'राम' तुझा तो नित्य सोबती
'हनुमंत' सखा तुज सांगाती
सन्निध 'शनी, गणेश' मूर्ती
'धूनी' पेटते सर्वकाळ ती !
'संगमरवरी' सुंदर मूर्ती
महाराष्ट्र-भारतात सर्वत्र ख्याती
चित्त तुझिया वाटेवरती
भाविक 'साईनाम' गर्जती !
शिकवण तुझीच 'श्रद्धा-सबुरी'
शिरडी 'रघुपति राघव' गजरी
साईनामे बद्ध वैखरी
'काव्यपुष्पार्पण' चरणावरी !

- रामचंद्र परब
१/२१, १२८ बंदुकवाला बिल्डिंग,
मतार पाखाडी रोड, माझगांव, मुंबई.

# साई अनुभव



## मी पाहिलेले साईबाबा !

तुझे रूप साई सदा आठविते  
तुझ्या कृपेने मी शब्द चार लिहिते  
क्षमा करावी मला हो साई  
''मजपाशी कवित्व नाही''

नगर जिल्ह्यात शिरडी संस्थान असून माझे वडील कै. नारायण दामोदर सबनीस हे मामलेदार म्हणून नगर जिल्ह्यातच जामखेड येथे होते. त्या परिसरातच शिरडी स्थान असल्यामुळे आमच्या घरच्या टांग्यातून बाबांच्या दर्शनाला आमचे जाणे होत असे. माझे वडील धार्मिक वृत्तीचे होते. ते बाबांचे भक्त होते. १९१६च्या सुमारास मी दीड वर्षांची असेन; पण मला त्यावेळची शिरडी चांगली आठवते. बाबा उर्दू व अर्धमराठी भाषेत थोडेच बोलत. ते माझ्या वडिलांबरोबर बोलत. ''राम-रहीम सर्व एकच आहेत; अल्ला सबका भला करे'', असे म्हणून ते आमच्या सर्वांच्या कपाळी उदी लावत असत. माझ्या आईला उदी देऊन म्हणत, ''माँ, तुझ्याजवळ ठेव व सबुरीने येत जा.''

त्यावेळी शिरडीला जाण्याकरिता चांगला रस्ता नव्हता. कुठे खड्डे, कुठे पाण्याने साचलेली डबकी. खडबडीत रस्त्यामुळे खूप त्रास होत असे. पाण्याची दुर्भिक्षता होती. जंगली क्रूर प्राण्यांमुळे दिवसाउजेडी भक्तमंडळींना इतर काही सोय नसल्यामुळे बैलगाडीतून प्रवास करावा लागे.

बाबांचे दर्शन घेतल्यावर मात्र श्रमपरिहार होई; कारण बाबा सर्वांचे हसून स्वागत करीत व म्हणत, अरे, कशाला त्रास करून मला भेटायला येता; जरा सबूर का नाही करीत. ते त्यांचे रूप म्हणजे मुखावर तेज, डोळ्यांत चमक, अंगकांती सडपातळ व चाल भराभर, अंगात कफणी, डोक्याला फडका. आजही डोळे मिटून गतकाळात गेल्यावर माझ्यासमोर त्यांची ती तेजस्वी मूर्ती उभी ठाकते. ते निंबाच्या झाडाखाली चौथऱ्यावर बसलेले असत.

करू शिरडीला वंदन  
शिरडी मोक्षाचे धाम ।। धृ० ।।

तिथे वसती साईंची  
भक्तजनांचा रक्षक तोचि  
तयाला शतदा वंदन  
शिरडी मोक्षाचे धाम ।। १ ।।

कृपावंत ते सर्वांसाठी  
तयांची महानता मोठी  
साई कल्पतरू जाण  
शिरडी मोक्षाचे धाम ।। २ ।।

शिरडी पुण्याचे स्थान  
सार्थकी लागतसे जीवन  
सोडूनि द्यावे मीपण  
शिरडी मोक्षाचे धाम ।। ३ ।।

शिरडीला पुन्हा-पुन्हा यावे  
साईपुढे नतमस्तक व्हावे  
साई तरून नेई जीवन  
शिरडी मोक्षाचे धाम ।। ४ ।।